**मे. लॉयड मेटल्स अॅन्ड एनर्जी प्रा. लि., प्लॉट नं. ए-१ व २ म.औ.वि.मंडळ घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प ४.० दशलक्ष टन प्रति वर्ष पेलेट प्लॉट, ०.८४ दशलक्ष टन प्रतिवर्ष ब्लास्ट फर्नेस, ०.४ दशलक्ष टन प्रतिवर्ष कोक ओव्हन, ६७० टन प्रति दिवस ऑक्सिजन प्लांट, EAF मार्फत स्टील मेल्टिंग शॉप (१.०५ दशलक्ष टन प्रतिवर्ष), वायर रॉड आणि TMT चे उत्पादनाकरीता रोलिंग मिल (१.२ दशलक्ष टन प्रतिवर्ष) आणि ९० मेगावॅट पॉवर प्लांट प्रस्तावित आहे. सद्या ०.६८४ दशलक्ष टन प्रतिवर्ष स्पॉन्ज आयर्न प्लांट ज्यामध्ये ०.३२४ दशलक्ष टन प्रतिवर्ष कार्यरत आणि ०.३६० दशलक्ष टन प्रतिवर्ष बांधकामाधीन आहे तसेच ०.२१६ दशलक्ष टन प्रतिवर्ष /१५० टन प्रति तास कोल वॉशरी आणि ८५ मेगावॅट पॉवर प्लांट (२५ मेगावॅट कार्यरत आणि ६० मेगावॅट बांधकामाधीन) प्लाट क्रं. ए-१ व ए-२ एम.आय.डी.सी. क्षेत्र घुग्घुस, खसरा क्र. १७, ३० व इतर गाव उसगाव तसेच खसरा क्र. २०५, २०६ व इतर घुग्घुस ता. जि. चंद्रपूर या ठिकाणी प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ३०/०९/२०२४ |
| वेळ | : | दुपारी १२:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, प्लॉट नं. ए-१, २, एम.आय.डी.सी. घुग्गुस, ता. जि. चंद्रपूर |

**प्रस्तावनाः-**

मे. लॉयड मेटल्स अॅन्ड एनर्जी प्रा. लि., प्लॉट नं. ए-१ व २ म.औ.वि.मंडळ घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर येथे प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प ४.० दशलक्ष टन प्रति वर्ष पेलेट प्लॉट, ०.८४ दशलक्ष टन प्रतिवर्ष ब्लास्ट फर्नेस, ०.४ दशलक्ष टन प्रतिवर्ष कोक ओव्हन, ६७० टन प्रति दिवस ऑक्सिजन प्लांट, EAF मार्फत स्टील मेल्टिंग शॉप (१.०५ दशलक्ष टन प्रतिवर्ष), वायर रॉड आणि TMT चे उत्पादनाकरीता रोलिंग मिल (१.२ दशलक्ष टन प्रतिवर्ष) आणि ९० मेगावॅट पॉवर प्लांट प्रस्तावित आहे. सद्या ०.६८४ दशलक्ष टन प्रतिवर्ष स्पॉन्ज आयर्न प्लांट ज्यामध्ये ०.३२४ दशलक्ष टन प्रतिवर्ष कार्यरत आणि ०.३६० दशलक्ष टन प्रतिवर्ष बांधकामाधीन आहे तसेच ०.२१६ दशलक्ष टन प्रतिवर्ष /१५० टन प्रति तास कोल वॉशरी आणि ८५ मेगावॅट पॉवर प्लांट (२५ मेगावॅट कार्यरत आणि ६० मेगावॅट बांधकामाधीन) प्लाट क्रं. ए-१ व ए-२ एम.आय.डी.सी. क्षेत्र घुग्घुस, खसरा क्र. १७, ३० व इतर गाव उसगाव तसेच खसरा क्र. २०५, २०६ व इतर घुग्घुस ता. जि. चंद्रपूर या ठिकाणी प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र या प्रकल्पाच्या उभारणीच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक १८ जुलै २०२४ रोजी रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-१ (अ) मध्ये

मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. लॉयड मेटल्स अॅन्ड एनर्जी प्रा. लि., प्लॉट नं. ए-१ व २ म.औ.वि.मंडळ घुग्घुस, ता. जि. चंद्रपूर, महाराष्ट्र यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २५/०७/२०२४ अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी १२:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक २८/०८/२०२४ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, VCA समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
४. प्रादेशिक कार्यालय/ उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय, चंद्रपूर, जि. चंद्रपूर.
९. तहसिल कार्यालय, चंद्रपूर, जि. चंद्रपूर.
१०. नगर परिषद कार्यालय, घुग्घुस, ता. जि. चंद्रपूर.
११. ग्राम पंचायत कार्यालय, मुरसा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.

१२. ग्राम पंचायत कार्यालय, म्हातारदेवी, ता. जि. चंद्रपूर.
१३. ग्राम पंचायत कार्यालय, उसगाव, ता. जि. चंद्रपूर.
१४. ग्राम पंचायत कार्यालय, बेलसनी, ता. जि. चंद्रपूर.
१५. ग्राम पंचायत कार्यालय, शेनगाव, ता. जि. चंद्रपूर.
१६. गट-ग्राम पंचायत कार्यालय, सोनेगाव, ता. जि. चंद्रपूर.
१७. गट-ग्राम पंचायत कार्यालय, वेंढली, ता. जि. चंद्रपूर.
१८. ग्राम पंचायत कार्यालय, पांढरकवडा, ता. जि. चंद्रपूर.
१९. ग्राम पंचायत कार्यालय, वढा, ता. जि. चंद्रपूर.
२०. ग्राम पंचायत कार्यालय, नकोडा, ता. जि. चंद्रपूर.
२१. ग्राम पंचायत कार्यालय, धानोरा, ता. जि. चंद्रपूर.
२२. ग्राम पंचायत कार्यालय, पिपरी, ता. जि. चंद्रपूर.
२३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते २३ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्पा स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-१५८/२०२४ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (ड्बल्युपीसी) पीएच/बी-२४०९१९-एफटीएस-०२८४ दिनांक १९/०९/२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | समन्वयक |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत ७१ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. ---, अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण

- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

१) **श्रीमती अनु खानझोडे, मुख्याध्यापिका, प्रियदर्शनी गर्ल्स हायस्कूल, चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | लॉयड्स फाऊंडेशन तर्फे आमच्या शाळेला २२०० चौ. मी. क्षेत्रात शेड बांधून दिले आहे. शाळेमध्ये जवळपास ७५० ते ८०० विद्यार्थी शिकत आहेत. त्यांच्याकरिता प्रशस्त असे दोन स्वच्छता गृह लॉयड्स मेटल्स उद्योगाने पूरविलेले आहे. तसेच २१ संगणकांची प्रशस्त आयटी लॅब पूरविलेली आहे. शाळेमध्ये १००० पुस्तकांचे ग्रंथालय पूरविण्यात आले आहे. शाळेमध्ये अद्यावत स्वरूपाची प्रयोगशाळा उपलब्ध करून दिलेली आहे. शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याकरिता RO प्युरिफायर सुविधा पूरविण्यात आली आहे. शाळेच्या सभोवताल संरक्षण भिंत बांधून दिलेली आहे. शाळेतील गरजू विद्यार्थ्यांकरिता लॉयड्स फाऊंडेशन तर्फे ७५० विद्यार्थ्यांना गणवेशाचे वितरण करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देखील देण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड देखील करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जनजागृती करण्याकरिता कार्यशाळा घेतलेली आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

२) श्रीमती कुंदा देविदास पावडे, इंदिरा कन्या विद्यालय, पडोली, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या शाळेमध्ये प्रशस्त ग्रंथालय उपलब्ध करून दिलेला आहे. कंपनीने प्रदूषण नियंत्रणाकरिता अद्यावत उपाययोजना केल्या आहेत. शाळेमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. माझ्या शाळेकरिता लॉयड्स फाऊंडेशनतर्फे वॉटर प्रुफ शेड बांधून देण्यात यावे. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. तसेच माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

३) श्री. हितेश दामोदर कुकडे, सरपंच ग्रामपंचायत, पांढरकवडा, ता. जि.चंद्रपूर:

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | पांढरकवडा येथील कुशल व्यक्तिंना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. अकुशल व्यक्तिंना कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण देण्यात यावे व रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. तसेच शाळांकरिता CSR निधीचा वापर करण्यात यावा. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

४) श्री. ईबादुल सिद्दीकी, सामाजिक कार्यकर्ता, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर उद्योगामुळे आधीच परिसरात प्रदूषणाचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे स्थानिक नागरीकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. उद्योग नागरी वसतीच्या जवळ स्थित असल्यामुळे सदर परिसरात प्रदूषणाची समस्या आहेच. सदर प्रकल्प दुसऱ्या ठिकाणी हलवायला पाहिजे जेणेकरून घुग्घूस शहराचे प्रदूषण कमी करण्यास मदत होईल. सदर प्रकल्पाला आमचा विरोध नाही. तसेच आरोग्य शिबिरे घेण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

५) **डॉ. अपर्णा शुक्ला, मुख्याध्यापिका, न्यु इंग्लिश हायस्कूल तथा महाविद्यालय, पांढरकवडा, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा मे. लॉयड्स मेटल्स या उद्योगाद्वारे पूरविण्यात आले आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप केले आहे. वेळोवेळी आरोग्य शिबीरांचे आयोजन लॉयड्स इंफिनिटी फाऊंडेशन तर्फे करण्यात आले आहेत. आमची मागणी आहे की, शाळेकरिता उद्यान तयार करून देण्यात यावे. शाळेकरिता सदर लॉयड्स फाऊंडेशनने संगणक उपलब्ध करून दिलेले आहेत परंतु विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान देण्याकरिता शाळेमध्ये शिक्षक पूरविण्यात यावा ही माझी विनंती आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

६) **श्री. राजीव कक्कड, जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तथा नियोजन समिती सदस्य, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनी विस्तारीकरण प्रकल्प उभारणार आहे. लॉयड्स कंपनीने प्रदूषण कमी करण्यासाठी लोकहिताचे कार्य केलेले नाही. आज पर्यावरण विषयक जनसुनावणी असल्याने येथे पाणी फवारणी करण्यात आली आहे. मी वेळोवेळी निवेदन, तक्रारी करूनही कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही. कंपनीमुळे होणाऱ्या प्रदूषणावर आळा घालणे गरजेचे आहे. जोपर्यंत कंपनी प्रदूषण विषयक उपाययोजना करत नाहीत तोपर्यंत या प्रकल्पाला परवानगी देण्यात येऊ नये. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

७) **श्री. रितेश झोडे, पांढरकवडा, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने शेतकऱ्यांना खड्डा बुजविण्यासाठी माती पूरविण्यात आली असल्याचे येथे सांगण्यात आले. कंपनीने कृपया त्यांची नावे येथे जाहीर करावी. कंपनीने एकाही शेतकऱ्याची मदत केलेली नाही. खोटी माहिती येथे सादर | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | |
|---|---|---|
| | केलेली आहे. CSR निधी आजुबाजूच्या परिसरातील गावांकरिताच खर्च करावयाचा असतो. सदर कंपनीमधून रात्री धूळ सोडण्यात येते. त्यामुळे पांढरकवडा गावातील नागरीकांमध्ये आरोग्याच्या समस्या जसे की कर्करोगासारखे घातक रोग होत आहेत. येथून ४-५ किमी अंतरावर स्थित असलेल्या पांढरकवडा येथे कर्करोगाचे प्रमाण वाढले आहे. आरोग्य शिबीरांमध्ये फक्त तपासणी करण्यात येते व उपचाराकरिता २० कि.मी. अंतरावर स्थित असलेल्या हॉस्पीटलमध्ये बोलविण्यात येते. त्यामुळे माझा या प्रकल्पाला विरोध आहे. | |

८) **<u>श्री. सुभाष गोहोकार, वढा, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वढा या गावाचे हवाई अंतर १.५ ते २.० किमी अंतरावर आहे. सदर कंपनीच्या प्रदूषणामुळे गावातील शेतीवर विपरीत परिणाम होत आहे. या परिसरामध्ये लॉयड्स, एसीसी व गुप्ता एनर्जी सारखे मोठे मोठे उद्योग कार्यरत आहेत. घुग्घूस हे जगातील सर्वात प्रदूषित शहरांमध्ये नोंद आहे. हिवाळ्यामध्ये दृष्यमानकता फार कमी होते. सदर उद्योगामुळे ऊसगांव, माथोली, मुंगोली, नकोडा व वढा ही गावेसुद्धा प्रदूषणामुळे प्रभावित होत आहेत. वर्धा नदीच्या जल प्रदूषणाचा परिणाम वर्धा नदीच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या गावांवर देखील होत आहे. त्या गावांचा समावेश अहवालात केलेला नाही. त्यामुळे कंपनीने CSR निधीचा योग्य तो वापर उपरोक्त नमूद गावांमध्ये देखील करावा. प्रदूषणामुळे आमच्या शेतीचे नूकसान होत आहे. सदर उद्योगातर्फे अप्रत्यक्ष रोजगार देण्यात येत आहे. प्रत्यक्ष रोजगार लॉयड मेटल्सच्या Payroll वर देण्यात यावा. शेतीच्या समस्यांचे कंपनीने निराकरण करावे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

९) **<u>सौ. निविदा ठाकरे, सरपंच, ग्रामपंचायत ऊसगांव, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर कंपनीचे विस्तारीकरण माझ्या गावाकडे होत असल्याने कंपनीने माझ्या गावातील प्रत्येकाला रोजगार | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | द्यावे. किमान ५०० लोकांना रोजगार द्यावा. शेतीविषयक उपायोजना करावे. तसेच आरोग्यावर होणाऱ्या विपरीत परिणामाकरिता कंपनी काय उपाययोजना करणार आहे याची माहिती देण्यात यावी. कंपनीच्या प्रदूषणामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात येणार नाही याची खात्री कंपनीने द्यावी. कंपनीने आमच्या गावात संसज्ज दवाखाना उपलब्ध करून द्यावे. कंपनीने गरजू व्यक्तिंचा उपचार नागपूर येथे करून द्यावे. तसेच आमचा गावाला दत्तक घेण्यात यावे. | |

१०) **<u>श्री. युवराज महादेव बांगडे, लॉयड मेटल्स कामगार संघटना, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी सन १९९५ पासून कंपनीमध्ये कार्यरत आहे. सुरूवातीच्या काळात २-४ वर्षे कंपनीमुळे प्रदूषण होत होते. कंपनीने वेळोवेळी नवनवीन अद्यावत उपकरणे बसविली व त्यामुळे प्रदूषणाचे प्रमाण कमी करण्यास मदत झाली आहे. सुरक्षा उपकरणे कंपनीद्वारे वेळोवेळी कामगारांना उपलब्ध देण्यात आलेली आहेत. कंपनीने जागोजागी ४५००० झाडे लावलेली आहेत. सिमेंट रोड तयार करण्यात आले आहेत. शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

११) **<u>सौ. पुष्पा मालेकर, शेनगांव, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या गावाकरिता CSR फंडाचा जास्ती जास्त प्रमाणात वापर करण्यात यावा. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

१२) **<u>सौ. वैशाली चंदू म्हात्रे, ग्रामपंचायत पिंपरी, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या गावामध्ये सौर ऊर्जेचे पथदिवे लावले. बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करन दिला. शाळेमध्ये RO लावून दिला ज्यामुळे शुद्ध पिण्याच्या पाण्याची समस्या निकाली | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | लागली. कंपनीला विनंती आहे की, त्यांनी रोजगाराच्या संधी आणखी द्याव्यात. | |

**१३) <u>ॲड. रूपेश गुणवंत ठाकरे, सरपंच, ग्रामपंचायत मुंगोली, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | यापूर्वी याच प्रकल्पाची जनसुनावणी दि. ३०/०६/२०२१ रोजी याच ठिकाणी घेण्यात आली होती. त्या जनसुनावणीमध्ये प्रत्यक्षात एकूण ३३ लोकांनी/ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केले त्यात, ३१ लोकांनी विरोध/आक्षेप/समस्या/सूचना मांडल्या तर फक्त ०२ लोकांनी सदर प्रकल्पाला पाठिंबा दिला. तसंच ३० निवेदन प्रकल्पाबाबत प्राप्त झाले. त्यातही २२ लोकांनी विरोध/आक्षेप/समस्या/सूचना मांडल्या तर ०८ लोकांनी पाठिंबा/संमतीपत्र दिले आहे. त्य जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे/प्राप्त झालेले निवेदन व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेले उत्तरे यांचा समावेश नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल प्रकल्प प्रवर्तकांनी MPCB/CPCB/प्रशासनाकडे सादर केला का? | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| २) | दि. ३०/०६/२०२१ रोजी जनसुनावणीमध्ये मांडलेल्या सुचना/ आक्षेप/ विरोध/ समस्या/ पाठिंबा/ संमतीपत्र व भावना कायद्यात नमूद केलेल्या तरतूदीप्रमाणे पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबईकडे या समितीने अहवाल तयार करून पाठवला असेल, त्यावर पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी ०३ वर्षे ०३ महिने ०१ दिवस झाला, त्यावर काय निर्णय घेतला हे आज पर्यावरण व वने हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनूसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीने आजच्या जनसुनावणीमध्ये सांगावं. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ३) | Chapter ७ page no. १६२<br>The present report is prepared for submission for Public hearing will be incorporate in the report after conduction of Public Hearing.<br>आजच्या जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मद्दे अंतर्भूत करून त्यावर अंमलबजावणी कराल का? | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ४) | Chapter १० Environment Management Plan | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्प अहवालात ज्या पद्धतीने पर्यावरणाचं व्यवस्थापन केल आहे. त्याच पद्धतीने त्याची अंमलबजावणी कराव व प्रकल्प प्रवर्तक हे अंमलबजावणी करत नसेल तर त्यावर M. P. C. B. ने कायदेशीर कार्यवाही करावी. | |
| ५) | Chapter ०८ Project Benefits<br>• Improvement in Physical Infrastructure<br>• Development Activities<br>• Rain water harvesting<br>• Tree Plantation<br>• Employ to Local people<br>• Socio-Economic Development<br>Chapter-११ Summary and Conclusion<br>प्रकल्प प्रवर्तकांनी ज्या पद्धतीने प्रकल्प अहवालात नमूद केल आहे, त्याच पद्धतीने त्याच जाणिवपूर्वक पालन कराव. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ६) | वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, जल, वायु, हवा प्रदूषण कमी करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी निरंतर कार्य कराव. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ७) | म्हातारदेवी येथे प्रकल्प प्रवर्तकामार्फत सुरू करण्यात येणाऱ्या C.B.S.E. शाळेमध्ये प्रकल्पग्रस्त गावातील विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश देऊन स्कूल बसची व्यवस्था करावी. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ८) | प्रस्तावित C.B.S.E. शिक्षक/कर्मचारी वृंद नियुक्त नेमणूक करतांना प्रकल्पग्रस्त गावातील शिक्षित तरूणांना/तरूणींना प्राधान्य द्याव. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ९) | प्रकलपामुळे शेतीपिकांचे नूकसान झाल्यास त्याची नूकसान भरपाई देण्याची तरतूद प्रकल्प प्रवर्तकांनी करावी. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| १०) | कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (CSR Fund) प्रकल्पग्रस्त गावांच्या विकासाकरिता ग्रामपंचायतीने केलेल्या कामाच्या मागणीनूसार निधी उपलब्ध करून देण्यात यावा. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

१४) **<u>श्री. श्रीकांत देशपांडे, अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | सूचना |
|---|---|
| १) | कृपया प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात यावे. जनसुनावणीचे ईतिवृत्त मंत्रालयाकडे सादर करण्यात येतात व मंत्रालय स्तरावर त्यावर निर्णय घेण्यात येतो. |

१५) **श्री. नितीन भटारकर, जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तथा नियोजन समिती सदस्य, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या प्रकल्पाची उत्पादन क्षमता वाढविण्याकरिता प्रस्तावित विस्तारीकरणाबाबत जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. प्रकल्प प्रवर्तक यांनी ज्या व्यक्तिंना येथे त्यांच्या समर्थनार्थ बोलावले त्यांना सांगायचं विसरले की सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक मुद्यांबाबत असून CSR बाबत नाही. मी या प्रकल्पाचा निषेध करतो. घुग्घूस शहराचा प्रदूषण निर्देशांक सन २०१३ मध्ये ८१.९० होता. परंतु सदर उद्योगातर्फे प्रदूषण कमी करण्याकरिता कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही. प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे सन २०१२ मध्ये या उद्योगाची रू. ५.० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आली होती. तसेच सन २०१३ मध्ये उद्योगाची रू. १०.० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आली होती. त्यानंतर दि ३१ मार्च रोजी रू. ५.० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आली होती. प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना न केल्यामुळे म.प्र.नि. मंडळाकडून सदर उद्योगाला रू. १.० कोटींची नूकसान भरपाई भरण्याबाबत नोटीस देण्यात आली होती. इतक्या मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील म.प्र.नि. मंडळाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्यामुळे निरी या संस्थेने सदर उद्योग बंद करण्याबाबत म.प्र.नि. मंडळाकडे अहवाल दिला होता. येथे रोजगाराबाबतच्या माहितीमध्ये तफावत दिसून येत आहे. मागील जनसुनावणीचे इतिवृत्ताचे मी अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की कंपनीने रोजगाराबाबत जे आश्वासन दिले होते ते पूर्ण केलेले नाहीत. तसेच स्थानिकांना डावलून परप्रांतीय लोकांना येथे रोजगार देण्यात आला आहे. आज लगतच्या क्षेत्रातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नूकसान झालेले आहे. पाण्याचा स्तर कमी झालेला आहे. तसेच हवेचा स्तर देखील खराब झालेला आहे. या प्रकलपाकरिता लागणारा कच्चा मालाची सुरजागड येथून वाहतूक करण्यात येते. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. सदर प्रकल्पात अपघात झाला तर त्याची नूकसान भरपाई देण्यात येते परंतु | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | जडवाहतूकीमुळे जर अपघात झाला तर अपघात ग्रस्तांना नूकसान भरपाई देण्यात येत नाही. सन २०२४ मध्ये प्रदूषण निर्देशांक ६३.६३ आहे. केंद्र शासनाच्या निर्णयाप्रमाणे एखादी क्षेत्राचा प्रदूषण निर्देशांक ६० च्या वर असेल तर त्या क्षेत्रात नविन उद्योग स्थापन करण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात येते. त्यामुळे सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. | |

१६) **श्री. विठ्ठल ठाकरे, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी सन १९९५ पासून कंपनीमध्ये कार्यरत आहे. सुरूवातीच्या काळात २-४ वर्षे कंपनीमुळे प्रदूषण होत होते. कंपनीने वेळोवेळी नवनवीन अद्यावत उपकरणे बसविली व त्यामुळे प्रदूषणाचे प्रमाण कमी करण्यास मदत झाली आहे. सदर उद्योगामध्ये काही त्रुट्या असल्यासत्या कंपनीने दूर कराव्यात, वृक्षारोपण करावे व रोजगाराच्या समस्या दूर कराव्यात. कंपनीने अद्यावत प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसवाव्यात जेणेकरून प्रदूषण कमी करण्यास मदत होईल. सदर विस्तारीकरण प्रकल्पामुळे रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील व रोजगाराच्या समस्या दूर होण्यास देखील मदत होईल. सद्य:स्थिती या उद्योगामध्ये बऱ्याच स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. २५ लोकांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्या प्रशिक्षणाचा फायदा या विद्यार्थ्यांना भविष्यात मिळणार आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या माध्यमातून माथोली, मुंगोली, वढा सारख्या गावांमध्ये पायाभूत सुविधा देण्यात याव्यात. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

१७) **श्री. संजय मारोती उकीनकर, सरपंच सोनेगांव, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | पर्यावरणाचे संवर्धन करण्यात यावे. अद्यावत प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात याव्यात. आरोग्य शिबीरे घेण्यात यावे. माझ्या गावासाठी रूग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात यावी. स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. आमच्या गावातील बेरोजगारांना देखील | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | रोजगार उपलब्ध करून द्यावा. सदर विस्तारीकरण प्रकल्पाला माझे समर्थन आहे. | |

## १८) श्री. आनंदकुमार मिश्रा, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या उद्योगाला लागूनच माझी शेती आहे. मे. लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लि या उद्योगामुळे माझ्या शेतात जायला रस्ता उपलब्ध नाही. याबाबत कंपनीकडे मागील ५-६ वर्षांपासून वारंवार तक्रार करून देखील कंपनी दुर्लक्ष करत आहे. माझी विनंती आहे की कंपनीने शेतात जायला रस्ता उपलब्ध करून द्यावा. कंपनीने सदर समस्येचे निराकरण केले नाही तर त्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याची माझी तयारी आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

## १९) श्री. सुर्या अडबाले, संस्थापक अध्यक्ष, स्वराज्य शेतकरी संघटना, विसापूर, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीलगत मिश्राजींची शेती आहे. त्यांनी तहसिलदार, जिल्हाधिकारी व लॉयड्स मेटलचे अधिकारी यांचेकडे निवेदन सादर केले परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यांच्याकडे आज उद्योगासमोर आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही. माझा लॉयड मेटल्स उद्योगाला प्रश्न आहे की, त्यांनी यांच्या समस्येचे निराकरण का केले नाही? प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांना प्रश्न आहे की त्यांनी प्रदूषण नियंत्रणाच्या उपाय़योजना का केल्या नाहीत. सदर कार्यालयात भरपूर निवेदने दिली परंतु आजपर्यंत एकाही तक्रारीचे निवारण प्रदूषण नियंत्रण मंडळाने केले नाही. तक्रारींच्या अनुषंगाने जनसुनावण्या का घेण्यात आल्या नाहीत. मिश्राजींच्या समस्येचे निराकरण केव्हा करण्यात येईल याचे उत्तर देण्यात यावे. कंपनी स्थानिकांना रोजगार का नाही देत. या परिसरात एसीसी सिमेंट उद्योग, गुप्ता कोल वॉशरी व २५ ते ३० वर्षांपासून लॉयड्स मेटल्स उद्योग कार्यरत आहे. ऊसगांव येथील स्थानिकांना रोजगार का नाही दिला जात? | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | शेतकऱ्यांच्या शेतीचे नूकसान होत असून त्याची नूकसान भरपाई का दिली नाही जात? प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर तात्पूर्ती कारवाई करण्यात येते. लॉयड्स मेटल्सच्या अधिकाऱ्यांनी सांगावं की त्यांनी ९ महिन्यांपूर्वी ज्या शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहीत केली त्यांना किती मोबदला दिला. | |

२०) **<u>श्री. सुरेंद्र वामनराव चटाळे, म्हातारदेवी तंटामुक्ति अध्यक्ष, म्हातारदेवी, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गावातील सरपंच, उप-सरपंच, ग्रामपंचायत सदस्य इत्यादी लोक त्यांच्या अधिकाराचा गैर फायदा उचलून कंपनीमध्ये रोजगार घेऊ शकतात. परंतु गावातील सुशिक्षित व उच्च शिक्षित बेरोजगारांना कंपनीमध्ये रोजगार उपलब्ध होत नाही. कंपनीने कमी शिकलेल्या लोकांना प्रशिक्षण उपलब्ध करून दिले आहेत परंतु गावातील शिक्षित लोकांना रोजगार देण्यात येत नाही. आमचा कंपनीच्या रोजगाराबाबतच्या या धोरणाला विरोध आहे. कंपनीने गावातील बेरोजगारांचा विचार करावा ही विनंती. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

२१) **<u>श्री. किशोर वरारकर, सरपंच, ग्रामपंचायत वढा, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | लॉयड मेटल्स या कंपनीच्या विस्तारीकरणामुळे सर्वात जास्त नूकसान शेतकऱ्यांचे होणार आहे. पयावरण विषयक सुविधा तुम्हा करणार परंतु त्याचाही त्रास शेतकऱ्यांनाच होणार आहे कारण वृक्षारोपण केल्यानंतर येथे जंगली प्राण्यांचा वावर वाढणार आहे. त्यांचा बंदोबस्त आधी करावा. रोजगारामध्ये गावातील सुशिक्षित युवकांना प्राधान्या देण्यात यावे. ज्या अशिक्षित लोकांना येथे तात्पुरते रोजगार देण्यात आले आहे त्यांनादेखील कायमस्वरूपी रोजगार देण्यात यावा. वढा हे गाव तीर्थक्षत्र आहे त्यामुळे वढा गाव कंपनीने दत्तक घ्यावे व त्याचा सोई-सुविधा उपलब्ध करून विकास करावा. प्रकल्पाचे विस्तारीकरण करताना प्रदूषणावर नियंत्रण करण्यात यावे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

२२) **<u>सौ. विजया अशोक बंडेवार, महिला सरोजिनी, महिला आर्थिक विकास महामंडळ, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे घुग्घूस शहरामध्ये निर्मल महिला ग्राम समुह समिती स्थापन कलेली आहे. या समितीसोबत ५० गट जुळलेले आहेत. दरवर्षी सदर प्रकल्पाची जनसुनावणी घेण्यात येते परंतु आजपर्यंत कोणत्याच आश्वासनांची पूर्तता करण्यात आलेली नाही. महिला बचत गटांना व्यवसाय करण्यासाठी लॉयड मेटल्स उद्योगाने मदत करावी जेणेकरून त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल. आजपर्यंतचा सीएसआर निधी कुठे खर्च करण्यात आला याची माहिती देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

२३) **<u>श्री. हरीदास गजानन देरकर, ऊसगांव, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | लॉयड्स प्रकल्पाचे विस्तारीकरण हे ऊसगांव या गावाच्या दिशेने होत आहे. त्यामुळे ऊसगांव या गावाला प्रदूषणाचा त्रास होणार आहे. ऊसगांव या गावात दळण वळणासाठी व्यवस्थित मार्ग उपलब्ध नाही. पावसाळ्यात परिस्थिती फार वाईट होते. घुग्घूस शहरात देखील प्रदूषणाचे प्रमाण खूप अधिक आहे. प्रदूषणामुळे नागरीकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. कंपनी रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात प्रदूषण करते व त्याचा परिणाम स्थानिक नागरीकांच्या आरोग्यावर होत आहे. सकाळी लोहचुंबक फिरवल्यास लोह खनिजाचे बारीक कण आपल्यास परिसरात परसेले दिसतील. सदर कंपनीने ग्रामपंचायत व शेतकऱ्यांना विश्वासात न घेता जमीन अधिग्रहीत केलेली आहे. तसेच बांधकाम सुरू करताना देखील कोणतीच परवानगी सदर कंपनीने घेतलेली नाही. ऊसगांव या गावात बेरोजगारीचे प्रमाण खूप जास्त आहे. ग्रामसभेदरम्यान कंपनीच्या प्रतिनिधींपुढे आम्ही ४१ मुद्दे मांडले व त्यांनी विनंती केली की सदर मुद्यांचे निराकरण करावे. त्यानंतरच ग्रामपंचायतीकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळेल. लॉयड्स मेटल या कंपनीच्या सीएसआर | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | निधीमधून कोणत्याही प्रकारचे काम करण्यात आले नाही. तसेच कोणत्याही बेरोजगाराला लॉयड्स मेटल्स उद्योगामध्ये रोजगार देण्यात आलेला नाही. येथे खोटी माहिती देण्यात येत आहे. माझी पहिली मागणी आहे की ऊसगांव येथील बेरोजगारांना रोजगार देण्यात यावा. सदर कंपनीचा ९० मेगावॅट क्षमतेचा वीज निर्मिती प्रकल्प प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पातून निर्माण होणारी वीज ऊसगांव वासीयांना मोफत देण्यात यावी. कंपनीने आमच्या सर्व मागण्या मान्य केल्या व त्यांची पूर्तता करण्याची हमी जर कंपनी देत असेल तरच आमची या प्रकल्पाला मान्यता आहे. | |

२४) **<u>सौ. ममता रमेश मोरे, ग्रामपंचायत सदस्य, नकोडा, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रस्तावित प्रकल्पामध्ये माझ्या गावातील जास्तीत जास्त युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्यावात. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

२५) **<u>श्री. राजू झोडे, काँग्रेस पक्ष, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | घुग्घूस शहर म्हणजे प्रदूषणाचे माहेरघर. घुग्घूस शहरामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण आहे. घुग्घूस शहरामध्ये सीएसआरच्या नावाखाली स्थानिकांना व प्रशासनाला मूर्ख बनविण्याचे काम येथील खाजगी कंपन्या करीत आहेत. लॉयड्स मेटलचा विस्तारीकरण प्रकल्प रोजगाराच्या दृष्टीने चांगला आहे परंतु रोजगाराच्या नावाखाली कंपनी किती लोकांचा जीव घेणार आहे असा प्रश्न मला आहे. चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी मुंबई येथे बैठकीमध्ये आश्वासन दिले की घुग्घूस शहराचे प्रदूषण अल्प कालावधी कमी करून घुग्घूस शहराला आदर्श शहर बनविण्यात येईल. परंतु सन २०२३ पासून ते आजपावेतो प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र शासन यांचेकडून घुग्घूस शहराचे प्रदूषण कमी करण्यासाठी कुठलीही पावले उचलण्यात आलेली नाही. माझी मा. अध्यक्ष व मा. खासदार, चंद्रपूर यांना विनंती आहे की त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांविरोधात कठोर | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | कारवाई करावी जेणेकरून प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर कठोर कारवाई करणार. या परिसरात प्रदूषणामुळे मोठ्या प्रमाणात श्वसनाचे आजार होतात. त्यामुळे या गंभीर समस्येकडे मा. अध्यक्षांनी लक्ष देण्याचे गरजेचे आहे. उद्योग येतील परंतु प्रदूषणावर आळा घालणे देखील गरजेचे आहे तसेच स्थानिकांचे आरोग्य जोपासणे देखील गरजेचे आहे. चंद्रपूर शहरामध्ये चांगली आरोग्य सुविधा आहे. परंतु घुग्घूस शहरामध्ये लॉयड्स मेटल या उद्योगाने सुसज्ज दवाखाना स्थानिकांकरिता आजपर्यंत उपलब्ध करून दिलेला नाही. याबाबत स्थानिकांतर्फे पाठपूरावा देखील करण्यात आलेला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात प्रदूषणामुळे नागरीकांच्या मृत्यूच्या प्रमाणात देखील वाढ झालेली आहे. मागील १० वर्षांच्या काळात प्रदूषणामुळे जवळपास ७००० ते ८००० नागरीकांचा मृत्यू झालेला आहे. वातावरणात धुलीकण, सल्फर डायऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड व आझोन या सारखे घातक गॅसेस सोडण्यात येतात. प्रदूषण नियंत्रणाकरिता प्रकल्प प्रवर्तकाने हरीत पट्टा निर्माण करणार असल्याचे सांगितले परंतु ती थातूर-मातूर उपाययोजना असल्याचे निदर्शनास येते. प्रदूषण नियंत्रणाकरिता कंपनीने ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. कोनसरी व सुरजागढ येथे कार्यरत असलेल्या लॉयड मेटल्स या उद्योगाच्या प्रकल्पांमध्ये तिथल्या स्थानिक बेरोजगारांनाच रोजगार मिळत नाही तर घुग्घूस शहरातील बेरोजगारांना रोजगार मिळेल याची शाश्वती काय? मोठ्या प्रमाणात बाहेरच्या लोकांना येथे संधी मिळते परंतु स्थानिकांना संधी मिळत नाही. सदर उद्योगामध्ये ३३ ते ४० टक्के आरक्षण देण्यात यावे. या कंपनीमध्ये एका विशिष्ट राजकीय पक्षाच्या कंत्राटदारांनाच कंत्राट देण्यात येते व सर्वसामान्य नागरीकांना कंपनी डावलते. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. शेतकऱ्यांना ४ पटीने नूकसान भरपाई देण्यात यावी. | |

२६) **<u>सौ. अस्मिती झाडे, घुग्धूस, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | उच्च शिक्षीत बेरोजगारांसोबतच कमी शिक्षीत बेरोजगारांना देखील रोजगार उपलब्ध करून द्यावा. तसेच | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | सुशिक्षीत महिलांना देखील रोजगार उपलब्ध करून द्यावा. लॉयड्स मेटल्सच्या प्रदूषणामुळे महिलांच्या आरोग्यावर देखील विपरीत परिणाम होत आहे. येथे फक्त खोटी आश्वासने देऊन वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला जातो. | |

२७) **श्री. राजू रेड्डी, शहराध्यक्ष, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मागील महिन्याच्या १५ तारखेला प्रदूषण नियंत्रण मंडळाला आम्ही एक निवेदन दिले होते परंतु आजपर्यंत सदर पत्राचे उत्तर आम्हाला प्राप्त झाले नाही. मे. लॉयड मेटल्सने येथे असलेल्या ५२ परिवारांना क्वॉरी मधून स्थलांतरित करून शांतीनगर येथे पुनर्वसन केले होते. परंतु तेथे पुनर्वासीयांना कोणत्याच सोई सुविधा उपलब्ध करून दिल्या नाहीत. लोकांचे आरोग्य जोपासले पाहिजे तसेच प्रदूषणाने ग्रस्त असलेल्या सर्व नागरीकांना रोजगार देण्याचा प्रयत्न कंपनीने केला पाहिजे. मागील सन २०२१ मधील जनसुनवणीमध्ये आश्वासन दिले होते की, ६५० लोकांना रोजगार देण्यात येईल. त्या आश्वासनाबाबत कंपनीने माहिती द्यावी. घुग्घूस शहरातील महिलांना रोजगार मिळायला हवा. तसेच त्यांना योग्य आरोग्य सुविधा मिळायला पाहिजे. सीएसआर निधीचा वापर स्थानिकांना सोई सुविधा पूरविण्यासाठी करण्यात यावा. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

२८) **श्रीमती प्रतिभाताई धानोरकर, खासदार, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | भारता लोह उत्पादनात जगात दूसऱ्या क्रमांकावर आहे. तसेच लोह उद्योग हा सर्वात प्रदूषणकारी उद्योग म्हणून मानल्या जातो. या जनसुनावणीला उपस्थित राहण्याचे कारण म्हणजे या प्रकल्पाच्या प्रदूषणाच्या तक्रारी वारंवार प्रशासनाकडे येत असून त्यावर योग्य कार्यवाही होत नाही. या उद्योगातर्फे वातावरणात घातक गॅसेस सोडले जातात व प्रदूषणाची धोक्याची पातळी गाठल्याचे दिसते. तसेच सांडपाण्यामुळे नागरीकांच्या आरोग्याचर विपरीत परिणाम होताना दिसत आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०१८ मध्ये प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन केल्यामुळे उद्योग | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | बंद करण्याचे निर्देश दिले होते. याबाबत निरी या संस्थेच्या अहवालात कंपनीने संमतीपत्रातील सर्व अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याचे नमूद आहे. कंपनीने याबाबत कोणताही ठोस पुरावा याबाबत सादर करू शकली नाही. कंपनी परिसरातील ८०० मीटर रस्त्याचे काम पूर्ण झालेले नाही. प्रदूषण नियंत्रणासाठी कन्व्हेअर बेल्टला आच्छादन केले नव्हते. या सर्व त्रुट्यांमुळे म.प्र.नि. मंडळाचे सदस्य सचिव यांनी लॉयड मेटल्स या कंपनीला पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन केल्याचे पत्र दिले. या कंपनीमुळे म्हातारदेवी, ऊसगांव, बेलसनी, शेनगांव, पांढरकवडा, वढा, नकोडा व पिरली ही गावे प्रभावित आहेत. या परिसरात रोजगाराचा मुद्दा महत्त्वाचा आहे. सदर कंपनीत १००३ लोक येथे कार्यरत आहेत व २१५० लोकांची भरती येथे करावयाची आहे. माझी कंपनीला विनंती आहे की त्यांनी २०० हेक्टर जमीन अधिग्रहीत करताना शेतकऱ्यांना योग्य मोबदला व प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एका सदस्याला रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. एखादा प्रकल्प आला की परिसरातील ग्रामपंचायतींना त्याचा फायदा होते व गावाचा विकास अपेक्षित असतो. सदर प्रकल्पाला लोकप्रतिनिधी म्हणून सहकार्य करण्यात येईल. परंतु कंपनीची देखील जबाबदारी आहे की त्यांनी एखाद्या विशिष्ट पक्षाची मक्तेदारी बंद केली पाहिजे. कंपनीच्या सीएसआर मधील गावांमधील शिक्षीत युवकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनूसार व कौशल्येनूसार रोजगार द्यावा. प्रकल्पाबाधित ७-८ गावांमधून आपण बेरोजगारांची यादी मागवावी व सर्व बेरोजगाराची मुलाखत घेऊन त्यांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार रोजगार द्यावा. कंपनीच्या माध्यमातून व्हॉल्वो आपरेटरचे प्रशिक्षण देण्यात यावे जेणेकरून परिसरात व्हॉल्वो ऑपरेटर उपलब्ध राहतील. महिलांकरिता देखील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. कंपनीमध्ये काम करणाऱ्या कामगारांचे पगार किमान वेतन नियमानूसार करण्यात यावे. म्हातारदेवी येथे स्वामी फ्युएल नावाची कंपनीच्या प्रदूषणाच्या बाबतीत जिल्हाधिकारी कार्यालयास पत्र दिले परंतु त्यावर काही कार्यवाही करण्यात आली नाही. कायदेशीर कार्यवाही होणे अपेक्षित आहे. कंपनीने सीएसआर निधीबाबत ग्रामपंचायतींची बैठक घेऊन त्यावर योग्य तो निर्णय घ्यावा. कंपनीने एका विशिष्ट पक्षाकडे लक्ष न देता सर्व पक्षांना कंत्राट दिले पाहिजे. येथे उपस्थित केलेल्या सर्व | |

| | | |
|---|---|---|
| | मुद्यांची दखल घेण्यात येईल व त्याचा पाठपुरावा करण्यात येईल ही अपेक्षा. | |

**२९) श्रीमती नीला चिवंडे, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनी स्थानिकांना रोजगार देत नाही. येथील शिक्षीत युवकांनी जायचे कुठे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

**३०) श्री. संजय कन्नावार, राष्ट्रीय समाज पक्ष, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे चंद्रपूर जिल्ह्यील प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर कारवाई करण्यात येत नाही. जनसुनावणीमध्ये फक्त आश्वासने दिली जातात ती पूर्ण करण्यात येत नाहीत. केळझर येथे कार्यरत असलेल्या रेल्वे सायडींगच्या प्रदूषणामुळे नागरीक त्रस्त आहेत. आमचा या विस्तारीकरण प्रकल्पाला विरोध आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

**३१) डॉ. योगेश दुधपचारे, ग्रीन प्लॅनेट सोसायटी, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मौजा घुग्घूस येथे ४.० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचे अतिरिक्त पॅलेट प्लांट, ०.८४ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचे अतिरिक्त ब्लास्ट फर्नेस, ०.४ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचे अतिरिक्त कोक ओव्हन, ६७० टन प्रतिदिवस क्षमतेचा अतिरिक्त ऑक्सीजन प्लांट, तसेच ९० मेगावॅट क्षमतेचा अतिरिक्त थर्मल पॉवर प्रोजेक्ट, १.०५ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचा रोलिंग मिल, ०.२१६ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेची कोल वॉशरी व कोल वॉशरीला जोडून ८५ मेगावॅट क्षमतेचा पॉवर प्लांट या ठिकाणी प्रस्तावित आहे. या कारखान्याच्या संदर्भात आमचे म्हणणे पुढीलप्रमाणे आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| २) | लोह कारखाने मानवी वसतीच्या दूर असावे – स्पाँज आयर्न ही अतिशय जुनाट पद्धती लोखंडाचे दुय्यम प्रतीचे उत्पादन घेते. जगातून स्पाँज आयर्न कंपन्यांच्या | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | प्रदूषणकारी प्रकारामुळे लोकांनी हाकलून दिले आहेत, आफ्रिका, दक्षिण अमेरिका, अशा सर्व भागात स्पाँज आयर्नच्या कारखान्यांना विरोध होते, परंतु ही कंपनी आधीच प्रदूषित असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात आम्हाला नको आहे. | |
| ३) | आधीच प्रदूषित ठिकाणी पुन्हा उद्योग नको- घुग्घूस हे शहर क्रिटीकली पोल्युटेड एरिया मध्ये मोडते. २०१३ मध्ये घुग्घूसचा CEPI ८१.९० इतका प्रचंड मोठा होता. ७० च्या वर असलेले उद्योगांची केंद्रे क्रिटीकली पोल्युटेड म्हणून ओळखली जातात. त्यावरून घुग्घूसची तीव्रता समजली जाऊ शकते. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ४) | घुग्घूसचे प्रदूषण येथील कोळसा खाणींमुळे आणखी वाढलेले आहे, घुग्घूस च्या परिसरात एकाचवेळी थर्मल, मायनिंग आणि स्पाँज आयर्न प्लांट यामुळे येथील प्रदूषण निसर्गाच्या वहन क्षमतेपेक्षा प्रचंड वाढलेले आहे. आणखी या शहरात प्रदूषित उद्योग नकोसा वाटत आहे. शेतीवर आधारित उद्योगांचे आम्ही मात्र स्वागत करतो. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ५) | आरोग्याच्या समस्या अशा प्रचंड प्रदूषित वातावरणामुळे घुग्घूस शहरात घरोघरी श्वसनाचे आजार जडले असून येथे आधीच जीवन जगण्याच्या पात्रतेचे नाही. त्यातही हा विसतार आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ६) | घुग्घूस येथील लॉयड मेटल्स कंपनीत वापरला जाणार कच्चा लोखंड हा चंद्रपूर जिल्ह्यात मिळत नाह त्यांची लांबून आयात केली जाते आणि घुग्घूस येथे त्यावर प्रक्रिया केली जाते. लोखंड मिळणाऱ्या परिसरात किंवा जिथे उद्योग नाही तिथे असे कारखाने लावावे. त्यामुळे उत्पादनाचे मुल्य कमी होईल आणि त्या परिसरात विकास होईल. परंतु मुद्दामुन घुग्घूस शांत आणि सहनशील स्वभावाच्या लोकांचे शहर असल्याने, हे सर्व प्रदूषणकारी कारखाने घुग्घूसला आणले जात आहेत. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ७) | जगभरातील स्पाँज आयर्न प्लांट ला कोळसा आधारित आणि गॅस आधारित अशा दोन प्रकारात विभगाले जाते, नॅसर्गिक वायुवर आधारित प्लांट हे प्रदूषणाच्या संदर्भात इको फ्रेंडली समजले जातात, पण घुग्घूस येथील प्लांट हा कोळशावर आधारित आहे, त्यामुळे प्रदूषणाची तीव्रता आणखीनच वाढणार आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ८) | वाहतूक-लांब अंतरावरून आयर्न ओर वाहून आल्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील रस्ते पूर्णत: खचले आहेत, चंद्रपूर ते गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड, आष्टी, अहेरी, सिरोंचा | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | या भागातील वाहतूकीचे रस्ते अवजड वाहनांनी पूर्णत: खराब केले आहे. ह्यासाठीच जिथे लोह खाणी आहेत त्यांचे परिसरात उद्योगही लावावे. | |
| ९) | ट्रकच्या लोडींग अनलोडींग प्रक्रियेतून पुन्हा प्रदूषण वाढते. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| १०) | परिसर प्रदूषित-गडचिरोली जिल्ह्यातील रस्त्याच्या शेजारील गावांचे रंग लाल झाले आहेत. नद्यांतील पाण्याचा रंग लाल झालेला आहे, त्यामुळे एका कारखान्यासाठी अनेक गावे प्रदूषित होऊ लागली आहेत. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ११) | अपघात-चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी आणि दक्षिणेला असलेल्या अनेक भागांत या ट्रक्समुळे मोठ्या प्रमाणात अपघात वाढले आहेत. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

**३२) श्री. व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | तुमच्या पर्यावरण सल्लागाराने वायु, जल व जमीनीचे चांगल्या प्रकारे बेसलाईन सर्वेक्षण केले आहे. माझी विनंती आहे की, त्यांनी आरोग्य विषयक, शेती विषयक व भूजल पातळी संदर्भात सर्वेक्षण करावे. पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्याकरिता रेनवॉटर हार्वेस्टींग प्रणाली बसवावी जेणेकरून भूजलाची पातळी कमी होणार नाही. परिसरातील गावांमध्ये वृक्षारोपण करावे व रस्त्याच्या कडेला देखील फळ झाडांची लागवण करावी. रोजगारामध्ये स्थानिक सुशिक्षीत युवकांना प्राधान्य द्यावे. तसेच स्थानिकांमध्ये कुशलता वाढविण्याकरिता कौशल्य विकास कार्यक्रम राबवावा. सीएसआर निधीबाबत ग्रामपंचायतींसोबत चर्चा करून विकास कामे करण्यात यावी. स्थानिकांसाठी आरोग्य शिबीरे घेण्यात यावी. गरीबांसाठी प्राथमिक शिक्षणाची सुविधा पूरविण्यात यावी. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

**३३) श्री. चेतन बोबडे, युवासेना शहर प्रमुख, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सन २०१८ मध्ये निरी व म.प्र.नि. मंडळ यांच्या संयुक्त पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने उद्योग बंद करण्यात आला होता तर मग आज ही जनसुनावणी | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आयोजन करण्याचे कारण काय. उद्योग बंद करण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत. १) अपुरी पाणी फवारणी यंत्रणा, २) कन्वहेअर बेल्टला लावण्यात येणाऱ्या आच्छादन गहाळ होणे आणि ३) कंपनीतून निघणारा काळा डस्ट. कंपनी बंद करण्याचे प्रमुख कारण ईलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसिपिटेटर. ईलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसिपिटेटर ही प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा आहे. त्यामुळे पर्यावरणात बॉयलरच्या चिमणीमधून काळा धूर निघत नाही. कंपनीने प्रदूषण नियंत्रण उपकरणे व्यवस्थित चालविली तर त्यांना कुठल्याही प्रकारचा विरोध होणार नाही. सिंचन विभागाने ४८ लाखांचे पाणी कर थकीत असल्यामुळे कंपनीचा पाणी पुरवठा खंडीत केला होता व कंपनीवर पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल केली होती. तसेच सदर कंपनीवर वेकोलिचे पाणी चोरी करत असल्याचा देखील ओराप करण्यात आला होता. सदर प्रस्तावित प्रकल्पासाठी कंपनीने नगर परिषदेचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतले आहे काय? माझ्याकडे पुरावा आहे की कंपनीने नगर परिषदेकडून कुठलेही ना-हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही. सीएसआर मध्ये कंपनीने सन २०२०-२१ मध्ये कोव्हीड-१९ दरम्यान रू. ३२.० लाख खर्च केल्याची माहिती द्यावी. तसेच सन २०२१-२२ मध्ये कंपनीने १.४५ कोटी रूपये खर्च केल्याची माहिती द्यावी. कोव्हीड-१९ दरम्यान कंपनीने घुग्घूस शहरातील जनतेची मदत केली नाही. | |

## ३४) <u>श्री. प्रदीप, शेतकरी, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर कंपनीच्या प्रदूषणामुळे घुग्घूस येथील शेतकऱ्यांचे सर्वात जास्त प्रमाणात नूकसान झाले आहे. कंपनीने आजपर्यंत त्यांना नूकसान भरपाई दिलेली नाही. तसेच त्यांच्या कुटुंबियांना रोजगार दिलेला नाही. माझी कंपनीला विनंती आहे की त्यांनी शेतकऱ्यांसाठी उपाययोजना केली पाहिजे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

३५) **श्री. गणेश शेंडे, शिवसेना उप-तालुका प्रमुख (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदन कंपनीची मागेदेखील जनसुनावणी घेण्यात आली होती. आमच्या निदर्शनास आले आहे की काही नकारात्मक गोष्टींचे सकारात्मक करून सादर करण्यात आले आहे. आम्ही कंपनीच्या विस्तारीकरणाला विरोध करत असतांना देखील येथे जनसुनावणी होत आहे. घुग्घूस शहराच्या मुख्य चौकात आपल्या कारखान्यामार्फत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यात यावा. लॉयड मेटल्स ते गुप्ता पॉवर प्लांट पर्यंत पांदण रस्त्यावरील अतिक्रमण हटवावे. त्यामुळे बऱ्याच प्रमाणात प्रदूषणाची समस्या आटोक्यात येईल. घुग्घूस परिसरातील सर्व स्थानिक उद्योगांनी शिक्षणाकरिता ५० टक्के सवलत द्यावी. तसेच सर्व स्थानिक उद्योगांनी आपातकालीन स्थितीमध्ये रूग्णांना ॲडमिट करून त्यांच्या औषधोपचार करावा. प्रकल्प प्रवर्तकाने आमच्या समस्या समजून त्या मान्य कराव्या. कंपनीमध्ये स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार कोणत्याही राजकीय दबावाखाली न येता देण्यात यावा. तसेच त्याचे कंत्राट स्थानिक नागरीकांना कोणत्याही राजकीय दबावाखाली न येता देण्यात यावा जेणेकरून स्थानिकांना रोजगाराची संधी मिळेल. आमच्या मागण्या मान्य न केल्यास कंपनी विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल. या परिसरातील ९५ टक्के नागरीक आजाराने ग्रस्त आहेत व त्याकरिता मे. लॉयड मेटल्स हा उद्योग कारणीभूत आहे. अकुशल कामगारांना कंपनीने प्रशिक्षण देऊन त्यांचे कौशल्य वाढविले पाहिजे व त्यांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. तसेच कामगारांच्या मुलांना कंपनीने मोफत शिक्षण दिले पाहिजे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

३६) **श्रीमती सरस्वती पाटील, संपादक, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मागील ३० वर्षांपासून लॉयड मेटल्स हा उद्योग या परिसरात कार्यरत आहे परंतु घुग्घूस शहराख विकास करण्यात आला | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | नाही. शहरातील नागरीक दमा, कर्करोग, चर्मरोग या गंभीर आजाराने मृत्यूमुखी पडत आहेत. स्थानिकांना कंपनीमध्ये रोजगार देण्यात यावा. लॉयड मेटल्स मॅनेजमेंट व ग्रामपंचायती मिळून कंपनीमध्ये अकुशल कामगारांना रोजगार दिला आहे व कुशल कामगारांना बेरोजगार ठेवण्यात आले आहे. येथे रोजगारासाठी आमच्या महिला आमरण उपोषणासाठी बसलेल्या आहेत. | |

**३७) <u>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूरः-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कृपया प्रकल्पाशी संबंधित प्रश्न विचारावेत. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

**३८) <u>माजी सरपंच म्हातारदेवी ग्रामपंचायत, ता.जि. चंद्रपूरः-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प सुरू करताना स्थानिकांना विश्वासात घ्यायला हवे. सरपंचाने गावातील बेरोजगार युवकांची यादी कंपनीला दिली पाहिजे व त्याबाबत पाठपुरावा केला पाहिजे. सीएसआर निधीचे व्यवस्थितरीत्या उपयोग केला पाहिजे. गावातील बेरोजगारांना रोजगार द्यावा. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

**३९) <u>एक महिला, म्हातारदेवी, ता.जि. चंद्रपूरः-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | म्हातारदेवी गावाला लॉयड मेटल्स उद्योगाने दत्तक घेतले पाहिजे. सरपंचाने गावातील बेरोजगार युवकांची यादी कंपनीला दिली पाहिजे व त्याबाबत पाठपुरावा केला पाहिजे. सीएसआर निधी अंतर्गत म्हातारदेवी गावामध्ये एकही कार्य करण्यात आले नाही. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

४०) **श्री. पंकज राजपूत, मनसे कार्यकर्ता, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | घुग्घूस शहरामध्ये प्रदूषणाचे प्रमाण खूप वाढले असून रस्त्याने दळण वळण करणे कठीण झाले आहे. प्रदूषणा करण्याचे प्रमाण कंपनीकडे आहे काय? येथे दाखविण्यात आलेली हवा गुणवत्ता ही चुकीची आहे. कंपनी दिवसा प्रदूषण नियंत्रण उपकरणे व्यवस्थित चालवितात व रात्रीच्या वेळी प्रदूषण नियंत्रण उपकरणे बंद करून उद्योग चालवतात. त्यामुळे घुग्घूस शहरात व आजुबाजूच्या परिसरात धुळीचे प्रमाण वाढते. प्रदूषणामुळे नूकसान झालेल्या शेतकऱ्यांना नूकसान भरपाई दिल्याचे सांगण्यात आले. कंपनीने नूकसान भरपाई दिलेल्या शेतकऱ्यांची नावे जाहीर करावी. सुरजागड येथून लोह खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर व्यवस्थित ताडपत्रीचे आच्छादन करण्यात येत नाही. त्यामुळे लोह खनिजाचे बारीक कण डोळ्यात जातात. जनसुनावणी असल्यामुळे समोरच्या रस्त्यावर पाणी फवारणी करण्यात आली आहे. चौकात लागलेल्या ट्राफिक सिग्नल मुळे मोठा अपघात होण्याची शक्ता आहे. अपघात झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून आंदोलन करण्यात येईल. लॉयड्स इंफानाईट फाऊंडेशन तर्फे पांढरकवडा येथे कृषी मेळावा घेण्यात आला तो कंपनीच्या फायद्यासाठी घेतला होता काय? माझी अधिकाऱ्यांना विनंती आहे की त्यांनी घुग्घूस शहराच्या चौकात उभे राहून पाहावे की या परिसरात किती प्रमाणात प्रदूषण आहे. माझ्याकडे पुरावे आहे की कंपनी रात्रीच्या वेळी प्रदूषण नियंत्रण उपरकणे न चालवता धूर सोडतात. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

४१) **श्री. अजय जोगी, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | शेतीचे मोठ्या प्रमाणात नूकसान झालेले आहे. घुग्घूस परिसरातील शेती नापीक झालेली आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने परिसराची पाहणी करावी म्हणजे त्यांना कळेल की या परिसरात किती प्रमाणात प्रदूषण होत आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

४२) <u>श्री. सलील अन्वर, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझा भारत देश जगातला सर्वात तरूण देश म्हणून ४ थ्या क्रमांकावर येतो. परंतु आज या देशात मागील ४५ वर्षातली सर्वात मोठी बेरोजगारी आहे. स्थानिकांना प्रकल्पामध्ये रोजगार मिळायला हवा. घुग्घूस शहरालगत मोठे उद्योग आहेत परंतु त्याचा फायदा स्थानिकांना का होत नाही हा माझा प्रश्न आहे. अपघात झाल्यावर दवाखान्यात जाण्यासाठी रूग्णवाहिकेची गरज असते परंतु त्यासाठी मे. लॉयड्स मेटल्स उद्योगातर्फे त्याकरिता रू. १५००/- घेण्यात आले. माझ्या गावातील नागरीकांना सदर रूग्णवाहिका मोफत मिळायला पाहिजे. रोजगारासाठी युवकांकडून रू. १५ लक्षची लाच घेऊन त्यांना रोजगार देण्यात येत आहे. कंपनीतर्फे जाहीर भरती घेण्यात यावी व त्यामधून शैक्षणिक अर्हतेनूसार बेरोजगारांना नौकरी देण्यात यावी. या परिसरामध्ये उष्णतेचे प्रमाण खूप आहे. उन्हाळ्यात शहराचा पारा ४७ ते ५०°से. पर्यंत जातो. आपला प्रकल्प सुरू झाल्यानंतर येथे उष्णतेचे प्रमाण आणखी वाढणार आहे व त्याचा त्रास स्थानिकांना होणार आहे. आपणांस विनंती आहे की प्रस्तावित वीज प्रकल्पामधून घुग्घूस वासीयांना मोफत वीज पुरवठा करण्यात यावा. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

४३) <u>श्री. शेखर, म्हातारदेवी, ता.जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे आयोजन केले आहे परंतु येथे पर्यावरण विषय सोडून इतर सर्व मुद्यांवर चर्चा होत आहे. सदर प्रकल्पामुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळणार आहे. परिसरातील उष्णतेसाठी फक्त कंपनीच नाही तर स्थानिक नागरीक देखील जबाबदार आहेत. कंपनी सीएसआरमार्फत अनेक कार्यक्रम घेण्यात आले आहेत. कंपनीने शेतकऱ्यांना फळांची झाडे द्यावी जेणेकरून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. लॉयड्स मेटल्स या कंपनीने Graduate Engineer Trainee या पदाकरिता वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रकाशित | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | केली होती. सदर जाहीरातीकडे स्थानिकांनी लक्ष दिले नाही. जर नागरीकांनी जाहीराज.तीकडे लक्ष दिले असते तर आज २ ऐवजी जास्त प्रमाणात लोकांना रोजगार मिळाला असता. सदर जाहीरातीमध्ये स्थानिकांना प्राधान्य देणार असल्याचे नमूद होते. आंदोलन युवकांनी करायला हवे होते परंतु प्रौढ व्यक्ति त्यांया स्वार्थासाठी आंदोलन करत आहेत. आज ३२ मुलांना Graduate Engineer Trainee म्हणून लॉयड मेटल्स या उद्योगात रोजगार प्राप्त झाला आहे. स्थानिक युवक अभियांत्रिकी मध्ये मेकॅनिकल किंवा ईलेक्ट्रीकल या विषयांव्यतिरिक्त दुसरे काही शिकत नाहीत. पर्यावरण व मेटालर्जीकल अभ्यासक्रम जर शिकते असतील तर त्याचा फायदा या कंपनीमध्ये रोजगारासाठी होईल. | |

४४) **<u>श्री. विजय महादेव बावने, शेनगांव, ता.जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनवणी प्रदूषणाशी निगडीत असून येथे बऱ्याच समस्या मांडण्यात येत आहेत. लॉयड्स मेटल उद्योगाच्या प्रदूषणाविरोधात बरेच आंदोलने, मोर्चे काढण्यात आले परंतु आजपर्यंत प्रदूषणावर तोडगा निघालेला नाही. कंपनीमुळे प्रदूषण आहे व त्यावर तोडगा देखील कंपनीच काढणार परंतु कंपनीला आपण स्थानिक नगारीक म्हणून सहकार्य करायला पाहिजे. कंपनीच्या विस्तारीकरणामुळे स्थानिकांना रोजगार मिळणार. परंतु प्रदूषणामुळे शेतकऱ्यांच्या व स्थानिकांच्या समस्यांचे निवारण कंपनीमार्फत होणे गरजेचे आहे. सीएसआर अंतर्गत कंपनीने माझ्या गावात काही चांगले कार्य केले आहे त्याची मी प्रशंसा करतो. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

४५) **<u>सौ. किरण विवेक बोढे, अध्यक्ष, प्रयास शक्ति मंच, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | लॉयड्स मेटल कंपनीचे विस्तारीकरण करताना स्थानिक महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळावा. कंपनीमुळे मोठ्या प्रमाणात होणाऱ्या प्रदूषणाचा त्रास महिलांना होत आहे. त्यावर कंपनीने आळा घालण्याकरिता प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना कराव्या. कंपनीच्या | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | विस्तारीकरणामुळे स्थानिक बेरोजगार युवकांना रोजगार प्राप्त होईल. | |

४६) **<u>श्रीमती बेगम, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | स्थानिकांना रोजगारात प्राधान्य दिले जात नाही. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. स्थानिकांच्या आरोग्याच्या देखभाल करण्यासाठी कंपनीने आरोग्य शिबीरे घ्यावे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

४७) **<u>श्रीमती यमुना पाटील, समाज सेविका, ता.जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | घुग्घूस शहरामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषणाचा त्रास आहे. कारण आम्ही झाडे लावतो, झाडांची कत्तल करतो व त्याचा इंधन म्हणून वापर करतो. प्रदूषण फक्त उद्योगांमुळेच नाही तर घरगुती प्रदूषण देखील घुग्घूस शहरात आहे. वृक्षारोपणासाठी जी जागा ठरविण्यात आली आहे तीचा वापर वृक्षारोपणासाठीच होत आहे किंवा नाही याची तपासणी केली पाहिजे. स्थानिकांना रोजगारात त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार प्राधान्य मिळाले पाहिजे. या परिसरामध्ये सर्व उद्योगांनी मिळून सुसज्ज दवाखाना उभारला पाहिजे जेणेकरून स्थानिकांना उपचारासाठी बाहेरगावी जाण्याची गरज पडणार नाही व रूग्णवाहिकेची गरज भासणार नाही. कंपनीने ग्रामपंचायतीसोबत संपर्क साधुन सीएसआर निधीचा वापर विकासकामे करण्यासाठी करावा. शेतकऱ्यांना त्यांच्या मागणीनूसार मोबदला देण्यात यावा. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

४८) **<u>श्री. सुरेश मल्हारी पाईकराव, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपल्या प्रकल्पात वीज निर्मिती केली जाते. तुम्हाला प्रकलपासाठी जेवढी वीज वापरायची आहे तेवढी वापर | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | करून उर्वरित वीज घुग्घूस शहराला व आजुबाजुच्या गावाला आपल्या प्रकल्पाच्या अंतर्गत वीज मोफत द्यावी. | |
| २) | आपल्या प्रकल्पात कंपनी किंवा आस्थापना आहे. तुमच्या हद्दीत येणारे सर्व गावातील बेरोजगार मुलींना, विधवा महिलांना, निराधार महिलांना, तलाक/घटस्फोटीत झालेल्या महिलांना आपल्या कंपनीमध्ये ठेकेदारी पद्धत बंद करून कंपनीमध्ये पर्मनंट काम द्यावे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ३) | पाणी उपसा करण्यासाठी कंपनीने ७० मीटर लांब तर ५० मीटर रूंद पाणी साठविण्यासाठी टाके/तलाव तयार करण्यात आले आहे. लाखो लिटर रोज पाण्याचा उपसा होणार आहे. त्यामुळे ऊसगांव, वढा, धानोरा, आणि समोरील गावांचा पाण्याचा तुटवडा होणार आहे. त्याकरिता घुग्घूस व आपल्या हद्दीत येणारे गावांसाठी मोफत द्यावे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ४) | आपल्या नवीत प्रकल्पासाठी ७५० बेरोजगारांना रोजगार मिळणार आहे त्या सर्व बेरोजगारांना रोजगार हे ठेकेदारी पद्धत बंद करून आपल्या कारखान्यात स्थायी स्वरूपात म्हणजे पर्मनंट नोकरी देण्यात यावी. मग तो शेतीवर लागणारा असो किंवा तो आपल्या शिक्षण पदवीवर लागणारा असो किंवा तो लबर असो हे सर्व ठेकेदार मध्ये नाहीतर कंपनीमध्ये पर्मनंट लावण्यात यावे. ठेकेदारी पद्धत बंद करावे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ५) | नोकर भरती करते वेळेस घुग्घूस व आजुबाजुच्या खेड्यांमध्ये एक भोंगा फिरवून जाहीरपणे आव्हान करण्यात यावे जेणेकरून सर्वांना माहिती मिळेल की नोकर किंवा लेबर भरती सुरू झाली आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ६) | घुग्घूस व आजूबाजूच्या गावांमध्ये तुम्हाला ते स्किल्ड कामगार पाहिजे ते आमच्या घुग्घूस व आजूबाजूच्या खेड्यात जर असे कामगार मिळाले नाहीत तर आपण आपल्या प्रकल्पाच्या माध्यमातून त्या बेरोजगारांना कंपनीमध्ये योग्य ते प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून द्यावा. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ७) | घुग्घूस व आजुबाजुच्या गावांमध्ये बरेच सिंगल मोटर मालिक आहेत. त्यांच्याकडे गाड्या असून त्यांना गाडी लावण्यासाठी किंवा त्यांना कामासाठी इकडे तिकडे फिरावे लागते आणि आमच्या गावात कंपन्या असून त्यांना काम मिळत नाही. घुग्घूस येथील सर्व सिंगल मोटर मालक व आपल्या हद्दीत येणारे सर्व खेड्यातील सिंगल मोटर मालकांना प्रथम काम देण्यात यावे. नंतर बाहेरील ट्रान्स्पोर्ट कंपनीला देण्यात यावे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ८) | महाराष्ट्र शासनाच्या नियमानूसार जर १०० कोटी कोणत्याही आस्थापना किंवा प्रकल्पाकरिता लोन म्हणून दिले जाते तर १०० कोटीच्या मागे २५० लोकांना रोजगार मिळतो. या उद्देशाने करोडोने प्रकल्पासाठी शासन लोन मंजूर करते. तर आपण शासनाकडून किती लोन घेतले आहे. ही माहिती लेखी स्वरूपात घुग्घूस व आजूबाजूच्या खेड्यांमध्ये जाहीर करावी आणि अर्जदार म्हणजे मलासुद्धा त्याची एक सत्यप्रत द्यावी. कारण आपला प्रकल्प ७०० कोटींचा आहे. त्या उद्देशाने आपल्या प्रकल्पात १५०० लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ९) | आपण आपल्या प्रकल्पाच्या माध्यमातून घुग्घूस व आजूबाजूच्या गावातील आरोग्यासाठी दवाखाना उभारून घुग्घूस येथील नागरीकांना योग्य आरोग्य लाभेल असे उपाययोजना करा. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| १०) | आपण घुग्घूस शहराच्या हितासाठी काय करणार. आम्ही घुग्घूस वासीयांच्या वतीने आपण आपले जड वाहतूक हे ऊसागांव फाट्यापर्यंत घेऊन जावे जेणेकरून प्रदूषणावर, ध्वनी प्रदूषण आणि भविष्यात होणाऱ्या अपघाताला टाळता येईल. एवढे उपकार आमच्या घुग्घूस वासीयांवर करावे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| ११) | आपण आपल्या आस्थापनामार्फत शाळा सुरू केली आहे. तर ती शाळा सीएसआर फंडाच्या माध्यमातून केली आहे की कसे. जर सीएसआर फंडाच्या माध्यमातून केली आहे तर आपण आपल्या कारखान्यात असणाऱ्या सर्च कामगारांच्या मुलांना मोफत शिक्षण द्याव. तसेच घुग्घूस येथील व आजूबाजूच्या गोर गरीब गरजू पालक आपल्या मुलांना उच्च शिक्षण देऊ शकत नाहीत अशा मुला, मुलींना आपल्या शाळेत मोफत शिक्षण द्यावे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |
| १२) | आपल्या प्रकल्पामुळे घुग्घूस व आजूबाजूच्या खेडे गावातील माझ्या शेतकरी बांधवांचे खूप मोठ्या प्रमाणात शेतीचे नूकसान होत आहे. शेतामध्ये सोयाबीन व कापसाचे पिक घेतात. परंतु आपल्या प्रकल्पाच्या प्रदूषणामुळै बारीक लोह्याचे कणामुळे ही शेतजमीन सुद्धा नापीक होत असल्याने त्या सर्व शेतकरी बांधवांना आपल्या कंपनीच्या हद्दीत येणारे सर्व शेतकऱ्यांना पीकांचे व शेत जमीनीचे नूकसान भरपाई देण्याम यावी. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

## ४९) श्री. अनिल नील, घुग्घूस व्यापारी संघटना, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | घुग्घूस शहराचा व्यापार हा मोडकळीस आलेला आहे. आमचा व्यापार लॉयड मेटल्स, एसीसी व वे.को.लि या उद्योगांवर अवलंबून आहे. घुग्घूस शहरातील लोखंडी पूल बंद झाल्यामुळे वे.को.लि.चे ग्राहक आमच्याकडे खरेदीसाठी येत नाहीत. राजीव रतन चौकात वाहनांची जास्त प्रमाणात वर्दळ असल्यामुळे देखील ग्राहक आमच्यापर्यंत पोहोचत नाहीत. सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे आमचा व्यापार वाढेल. या परिसरातील उद्योगांवर येथील जवळपास १००० दुकाने अवलंबून आहेत. स्थानिकांना सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामध्ये रोजगार मिळावा. प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी उपाययोजना कराव्या व लोकांचे आरोग्य साभाळावे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

## ५०) श्री. प्रदीप, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे घर कंपनीच्या गेटजवळ आहे. मी कंपनीच्या प्रदूषणाबाबत तक्रार दाखल केली होती. मागील ६ महिन्यांपासून प्रदूषणाचा कोणताही त्रास नाही. त्यामुळे माझे या प्रकल्पास समर्थन आहे. कंपनीने खुल्या जागेवर स्टेज बनवून दिला. घरापासून बस स्टँड पर्यंत रस्ता तयार करून दिला. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

## ५१) श्री. धीरज सुखदेव पाटील, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मागील ३० वर्षांपासून लॉयड मेटल्स या उद्योगाच्या माध्यमातून स्थानिकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या रोजगार मिळालेला आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरातील नागरीकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील तसेच सीएसआरच्या माध्यमातून होणाऱ्य कामांमुळे नागरीकांना | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | त्यांचे जीवनमान ऊंचावण्यास मदत होईल. त्यामुळे माझे या प्रकल्पाला समर्थन आहे. | |

५२) **<u>श्री. शरद पाईकराव, शहराध्यक्ष, वंचित बहूजन आघाडी, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | घुग्घूस, पांढरकवडा, शेनगांव, ऊसगांव परिसरातील नागरीकांनी अनेकदा प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे घुग्घूस शहराच्या प्रदूषणाबाबत तक्रारी दाखल केले आहेत. परंतु प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्याबाबत कधीच सभा घेऊन तक्रारींचे निवारण केले नाही. मा. खासदार श्रीमती प्रतिभाताई धानोरकर यांनी सांगितले आहे की या कंपनीला सन २०१८ मध्ये बंद करण्याचे नोटीस देण्यात आले आहे. परंतु सदर नोटीसीचे फक्त एक दिवस पालन करण्यात आले व दुसऱ्या दिवशी लगेच प्लांट सुरू देखील करण्यात आला. याबाबतची माहिती अधिकाऱ्यांनी द्यावी. त्यावेळेच्या अधिकाऱ्यांवर कंपनीसोबत संगनमत असल्याचे आरोप लावण्यात आले होते. आज माझ्या गावकऱ्यांनी व सहकाऱ्यांच्या मागण्या कंपनीतर्फे पूर्ण करण्यात येत असतील तरच माझा या प्रकल्पाला समर्थन आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

५३) **<u>श्री. अशोक काशिनाथ तोरडे, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे या प्रकल्पास समर्थन आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

५४) **<u>श्री. रोशन पचारे, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जनसुनावणीदरम्यान असंख्य लोकांनी समस्या उपस्थित केल्या आहेत. लॉयड मेटल्स यांचा प्रकल्प सुरू झाल्यानंतर स्थानिक व्यापाऱ्यांना रोजगार मिळणार. घुग्घूस शहराचा लोखंडी पूल वाहतूकीसाठी बंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे वे.को.लि. कॉलनीतील एकही ग्राहक येथे | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | खरेदीसाठी येत नाही. लॉयड मेटल्स उद्योगाने २००० महिलांसाठी रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. माझा या प्रकल्पाला जाहीर समर्थन आहे. कंपनीने सर्व पक्षांना निविदा द्यावी. घुग्घूस येथील प्रत्येक परिवारातील एका सदस्याला प्रकल्पामध्ये रोजगार द्यावा ही माझी विनंती आहे. सीएसआर निधीमधून घुग्घूस शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात यावा. कंपनीलगत असलेल्या रस्त्याचे बांधकाम करून रस्ता दुरूस्त करण्यात यावा. | |

५५) **श्री. सागर राजेश, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कंपनीमध्ये Graduate Engineer Trainee म्हणून रोजगार मिळाला आहे. कंपनीने प्रथम प्राधान्य घुग्घूस शहर वासीयांना दिलेले आहे व भविष्यात देखील कंपनी घुग्घूस येथील स्थानिक रहिवाशांनाच रोजगारात प्राधान्य देणार आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

५६) **श्री. विवेक बोढे, भारतीय जनता पार्टी, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सन १९९४ पासून मी या कंपनीला मोठे होताना पाहिले आहे. जेव्हा आमचे लोकप्रतिनिधी नव्हते तेव्हा स्थानिक नेत्यांनी कंपनी उभारण्यास परवानगी दिली. जेव्हा कंपनीची आर्थिक स्थिती चांगली नव्हती तेव्हा येथे चंद्रपूर, नागपूर व हैदराबादहून किती लोक कंपनीची बाजू घ्यायला तेव्हा झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित होते हा माझा प्रश्न आहे. आज अत्यंत हलाकीच्या परिस्थितीमध्ये ज्या मुलाने शिक्षण पूर्ण केले त्या मुलाला कंपनीने रोजगार दिलेला आहे. या कंपनीमध्ये ८० टक्के स्थानिकांना रोजगार मिळालेला आहे. आज चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे त्याबाबत येथे कोणीही प्रश्न उपस्थित करत नाहीत. सोबतच एसीसी लि व गुप्ता कोल वॉशरीच्या प्रदूषणाबाबत येथे प्रश्न उपस्थित केले जात नाहीत. आज कंपनीने ३४ मुलांना इंजिनियर म्हणून रोजगार दिला त्यापैकी २५ मुलं ही | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | घुग्घूस शहरातील आहेत. कंपनीने आजपर्यंत जी आश्वासने दिली ती पूर्ण केलेली आहेत. मा. पालकमंत्र्यांनी वृक्ष लागवड करून हरीत पट्टा वाढविण्याचा प्रयत्न केलेला आहे. येथे प्रश्न करणाऱ्यांनी त्यांच्या घरापुढे किती वृक्ष आहेत याची तपासणी करावी. कंपनी स्थानिकांना ८० टक्के रोजगार देण्याची हमी देत आहे. तसेच स्थानिक बचत गटांना ८० टक्के रोजगार देण्याची हमी कंपनी आम्हाला देत आहे. सन १९९४ मध्ये या परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. त्या काळात घरात धुळीचे साम्राज्य असायचे. आमच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सर्वप्रथम आम्ही कंपनीसोबत वाद घालायचो. कंपनीने अद्यावत तंत्रज्ञान वापरून प्रदूषण कमी केले आहे. सदर कंपनीतून निघणाऱ्या डस्ट पासून वीज निर्मिती होणार आहे. तसेच निघणाऱ्या वायु पासून वीज निर्मिती होणार आहे. अशा कंपनीमध्ये सामान्य नागारकांना रोजगार मिळत असेल तर आमचे या प्रकल्पाला समर्थन आहे. | |

५७) **श्रीमती सुनंदा विजय खिरटकर, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने स्थानिकांना रोजगार द्यावे. उद्योगामुळे स्थानिकांचा विकास होण्यास मदत होईल. त्यामुळे माझे या प्रकल्पाला समर्थन आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

५८) **श्री. सचिन गोंडावार, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी कोळसा खाणीमध्ये काम करतो. प्रत्येकवेळी येथे प्रदुषणाचा मद्दा उपस्थित केला जातो. आम्हा कोळशाला ०.५ मायक्रॉन पर्यंत पल्वराईज करतो व त्याचे कण श्वसननलिकेत जाते. त्यामुळे श्वसनाचे गंभीर आजार होऊ शकतात. परंतु प्रत्येकवेळी ला◌ूयड मेटल्सच्या प्रदूषणाचा मुद्दा मांडण्यात येतो. सन १९९४ मध्ये कंपनीला ना-हरकत प्रमाणपत्र देताना घुग्घूस शहराच्या प्रदूषणात वाढ होण्याची शक्यता त्यांना दिसली नाही काय? मी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे आभार मानतो की त्यांनी मागील ५ वर्षाच्या काळात प्रदूषण कमी करण्यास पावले उचलली | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आहे. सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामुळे स्थानिक नागरीकांना रोजगार मिळणार आहे. परंतु त्यासाठी आपण त्यास पात्र ठरलो पाहिजे. कंपनीने ठरवलेल्या निकषांनूसार स्थानिकांना रोजगार मिळेल. पाच वर्षांपासून कंपनीने रस्त्यांचे काम केले आहे, वृक्षारोपण केले आहे. त्यामुळे माझे या प्रकल्पाला समर्थन आहे. | |

**५९) श्रीमती वसुबाई सातपुते, ग्रामपंचायत सदस्य, पांढरकवडा, ता.जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांशी मी सहमत आहे. स्थानिक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून द्यावा. माझे या प्रकल्पास समर्थन आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

**६०) सौ. अंजना सुरेश पाझारे, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीमध्ये माझा मुलाला रोजगार मिळाला आहे. माझे या प्रकल्पास समर्थन आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

**६१) सौ. अर्चना पारशिवे, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे या प्रकल्पास समर्थन आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

**६२) सौ. वैशाली ढवस, ग्रामपंचायत सदस्य, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे या प्रकल्पास समर्थन आहे. कंपनीने बेराजगार महिलांना व युवकांना रोजगार द्यावा. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

### ६३) सौ. अस्मिता राजेंद्र दुधे, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने बचत गटांना बेराजगार महिलांना व युवकांना रोजगार द्यावा. कंपनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणार अशी आम्हाला खात्री आहे. त्यामुळे आमचे या प्रकल्पाला समर्थन आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

### ६४) सौ. नितू चौधरी, माजी जिल्हा परिषद सदस्य, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे या प्रकल्पाला समर्थन आहे. सदर क्षेत्र औद्योगिक क्षेत्र असल्यामुळे येथे बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

### ६५) श्री. आशिष अशोक मासिरकर, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जर सीएसआर निधीचा व्यवस्थित उपयोग होत असेल तर माझे या प्रकल्पाला समर्थन आहे. जर कंपनी परिसरातील प्रदूषण कमी करणार असेल तर माझे या प्रकल्पाला समर्थन आहे. कंपनी स्थानिकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय करून देणार असेल तर माझे या प्रकल्पाला समर्थन आहे. कंपनी स्थानिकांना आरोग्याच्या सुविधा, शिक्षणाची सुविधा, मोफत वीज व रस्त्यांची सुविधा मिळत असेल तर माझे या प्रकल्पाला समर्थन आहे. शांतीनगर परिसरातील समस्या सोडविण्यात याव्या. स्थानिकांना रोजगारात ८० टक्के प्राधान्य देण्यात यावे. उपरोक्त मागण्या पूर्ण न केल्यास कंपनीविरोधात आंदोलन करण्यात येईल. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

### ६६) श्री. मंदीप प्रकाश रोडे, जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, ता.जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रशासनाने घुग्घूस वासीयांना रोजच्या प्रदूषणाचे प्रमाण दाखवायला हवे. प्रदूषण विभागाने येथे पर्यावरण विषयक | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | जनसुनावणी आयोजित केली आहे व येथे पर्यावरणाविषयक मुद्दे मांडण्याचे सांगण्यात येत आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची मागणी आहे की प्रदूषण नियंत्रण मंडळाने दररोजच्या प्रदूषणाचे प्रमाण घुग्घूस वासीयांसाठी प्रदर्शित केले पाहिजे. घुग्घूस व आजुबाजूच्या परिसरातील युवक-युवती त्यांचे बायेडाटा घेऊन कंपनीमध्ये येतात परंतु मेन गेटवरील सुरक्षा रक्षक त्यांचे बायोडाटा घेऊन त्यांना हाकलून लावतात. प्रदूषण विभाग एखाद्या उद्योगाच्या प्रदूषणाचे प्रमाण दाखवण्यास दिरंगाई करते. लॉयड्स मेटल कंपनीने त्यांच्या गेटवर एक मानव संसाधन अधिकारी नेमावा जो परिसरातील युवक व युवतींचे बायोडाटा जमा करतील व त्यांच्या मुलाखती घेऊन शैक्षणिक अर्हतेनूसार त्यांना रोजगार द्यावे. परप्रांतीयांना रोजगार देण्यास आमचा विरोध नाही परंतु सर्वप्रथम स्थानिकांना रोजगार द्यावा. प्रदूषण नियंत्रण मंडळ व लॉयड्स मेटल यांना विनंती आहे की त्यांनी कायद्याचा चौकटीत राहून कार्यवाही करावी. | |

६७) **<u>बिरसा सेना अध्यक्ष, ता.जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या ठिकाणी स्थानिक लोकप्रतिनिधी, खासदार व स्थानिक नागरीकांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची कंपनीने पूर्ण कराव्यात. परिसरातील उच्च शिक्षीत आदिवासी बेरोजगारांना कंपनीमध्ये रोजगार उपलब्ध करून द्यावा. स्थानिकांमध्ये कौशल्य विकास करण्याकरिता कौशल्य विकास केंद्र स्थापन करून त्यांचे कौशल्य वाढवावे. तसेच महाराष्ट्र उद्योजगता विकास महामंडळ, चंद्रपूर येथे बरेच युवक प्रशिक्षण घेत असतात. त्याच प्रमाणे लॉयड मेटल्सने देखील स्थानिकांना प्रशिक्षण द्यावे ज्यामधून उच्च गुणवत्तेचे व दर्जेदार विद्यार्थी तयार करावे. तसेच त्या विद्यार्थ्यांना कंपनीमध्ये स्थायी स्वरूपाचा रोजगार द्यावा. कंपनीने त्यांच्या उत्पन्नापैकी फक्त २ टक्के सीएसआर निधी आदिवासी लोकांसाठी राखीव करून ठेवला तर त्या निधीमधून आदिवासी लोकांच्या समस्या सोडवले जाऊ शकतात. महाराष्ट्र राज्यात एकूण २५० प्रकारचे रोजगार उपलब्ध आहेत. महाराष्ट्र उद्योजगता विकास महामंडळ, चंद्रपूर यांचेसोबत कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत कुशल कामगार तयार करू शकतात. कंपनीने आरोग्य | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | शिबीरे घेतली पाहिजे. तसेच परिसरामध्ये ज्यांच्याकडे शौचालये नसतील अशा लोकांना शौचालये उपलब्ध करून द्यावे. | |

६८) **श्री. देवराव भोंगळे, अध्यक्ष, जिल्हा परिषद, ता.जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जनसुनावणीदरम्यान सर्वांची मते व समस्या येथे प्रशानसतर्फे ऐकून घेण्यात आल्या. मा. पंतप्रधान हे या देशामध्ये गुंतवणूक यावी यासाठी प्रयत्न करत आहेत. प्रत्येकाची मागणी आहे की त्यांना रोजगार मिळाला पाहिजे. मा. पालकमंत्री यांनी मागील वर्षामध्ये विविध उद्योगांना चंद्रपूर मध्ये येण्यास पाचारण केले. मागील वर्षभरात झालेल्या विविध बैठकांमध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याकरिता जवळपास रू १.६० लाख कोटी रूपयांचे सामंजस्य करारांवर स्वाक्षरी झाली. भविष्यात या दोन्ही जिल्ह्यांमध्ये रू. १.६० लाख कोटींची गुंतवणूक करून नविन रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. मे. लॉयड मेटल्स अॅण्ड एनर्जी लि. हा उद्योग चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यामध्ये रू. ४०,००० कोटींची गुंतवणूक करणार आहेत. सर्व नेत्यांनी त्यांचे हेवेगावे विसरून रोजगार देणाऱ्या कंपन्यांचे स्वागत केले पाहिजे. सन १९९४ मध्ये कंपनीला ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले व म्हातारदेवी येथे कंपनीच्या कॉलनीसाठी जागा देण्यात आली. सन १९९४ ते २०१४ पर्यंत कंपनीची हलाखीची परिस्थिती असूनसुद्धा कंपनीने एकाही कामगाराला कामावरून काढले नाही यासाठी कंपनीचे आभार. कंपनीला सुरजागड येथील खाण पट्टा आवंटीत झाला. खाणकाम सुरू झाल्यापासून कंपनीला नफ्यात आली व त्याचा फायदा घुग्घूस शहर व जवळपासच्या परिसरातील नागरीकांना होऊ लागला. आज कंपनीमध्ये एकूण ९५२ कामगार काम करत आहेत व त्याचा थेट फायदा परिसरातील ५००० लोकांना होत आहे. एकेकाळी घुग्घूस शहरामध्ये कोळसा खाणी होत्या. परंतु कालांतराने कोळसा खाणी घुग्घूस शहराच्या बाहेर गेल्या व त्यामुळे येथील व्यापार मंदावला. परंतु मे. लॉयड मेटल्सच्या विस्तारीकरणामुळे व्यापाऱ्यांना पाठबळ मिळाले व त्यांच्या व्यवसाय सुरळीत झाला. या परिसरातील शेतकऱ्यांना देखील काम मिळाले पाहिजे. येणाऱ्या काळात | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीमध्ये २१५० कामगारांची गरज असणार आहे व त्याचा थेट फायदा परिसरातील १०००० लोकांना होणार आहे. एखाद्या परिसरात उद्योग आला तर त्या परिसरात आर्थिक चलना मिळते. येथे आरोप करण्यात आला की एका विशिष्ट पक्षाची कंपनीमध्ये मक्तेदारी आहे परंतु कंपनी सर्व पक्षांचा समावेश करण्याचे काम करते. ५० कोटी वृक्ष लागवडीमुळे महाराष्ट्र राज्यात २० चौ.कि.मी जंगल क्षेत्रामध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या हरीत पट्ट्यामध्ये १३ चौ.कि.मी. क्षेत्राची वाढ झाली. याबाबत सर्वपक्षीय विधीमंडळ समितीने मा. पालकमंत्री, चंद्रपूर यांना क्लिनचिट दिली. या देशात महाराष्ट्र एकमेव राज्य आहे ज्याने ५० वृक्षांची लागवड करून ते जगवले आहे. जर कंपनी घुग्घूस शहररत आली नसती तर या परिसराचा रोजगार, स्वयंरोजगार व विकास थांबला असता. कंपनीच्या विस्तारीकरणामुळे स्थानिक नागरीकांना रोजगार मिळणार आहे. या परसिरात लॉयड व्यतिरिक्त आणखी दोन उद्योग कार्यरत आहेत परंतु त्या उद्योगामध्ये स्थानिकांना नौकऱ्या देण्यात येत नाही. कंपनीने शेतकऱ्यांसाठी प्रयोगशाळा उभारली पाहिजे. त्यांना कोणते पिक घ्यायचे व त्याची काळजी कशी घ्यायची याची माहिती दिली पाहिजे. तसेच कंपनीने कौशल्य विकास केंद्र स्थापन केले पाहिजे व त्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार दिला पाहिजे. घुग्घूस शहराच्या विकासामध्ये लॉयड मेटल्स या उद्योगाने योगदान दिले पाहिजे. तसेच या परिसरातील शाळांमध्ये शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी कंपनीने प्रशिक्षण दिले पाहिजे. जेणेकरून भविष्यात येणारी पिढी ही उच्च शिक्षीत होईल. बचत गटातील महिलांनासुद्धा कंपनीने प्रशिक्षण दिले पाहिजे. लॉयडस् मेटल्सने घुग्घूस वासीयांसाठी आरोग्य शिबीरे घेतली पाहिजे. तसेच आरोग्य विषयक जनजागृती केली पाहिजे. | |

६९) **<u>श्री. श्याम अगदारी, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सन २०२० मध्ये कंपनीचा एक कामगार वीजेच्या धक्क्याने मृत्यूमुखी पडला. ४ वर्षे उलटली परंतु त्याच्या जागेवर कंपनीने घरातील व्यक्तिला रोजगार दिलेला नाही. माझी | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | अध्यक्षांना विनंती आहे की त्यांनी या बाबीची दखल घ्यावी व कंपनीला निर्देश द्यावे. | |

## ७०) श्री. सतीश गौरकार, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | घुग्घूसच्या शेजारच्या परिसरात पांढकरवडा, म्हातारदेवी, वढा, शेनगांव, मुरसा, बेलसनी, धानोरा व पिपरी या गावांमध्ये शेतजमीन आहे. सदर उद्योगामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नूकसान होते. कंपनीने घुग्घूस नगर परिषदेकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेतले आहे काय? तसेच ८० टक्के लोग सहभागी असलेला गांव ठराव घेतलेला आहे काय? परिसरातील हवा प्रदूषित झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिक उत्पादनात घट होणार आहे. कंपनीने शेतीच्या नूकसान भरपाईबाबत लेखी आश्वासन द्यावे. माझा या प्रकल्पास तीव्र विरोध आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

## ७१) प्रकल्प प्रर्वकाने दिलेली उत्तरे:-

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | शिक्षण आणि शेतजमीन, आम्ही सीएसआर उपक्रमांतर्गत कृषी मेळावा १३०० शेतकरी जैन इरिगेशनचे मार्गदर्शन केले. सीएसआर टीमद्वारे आम्ही जैन इरिगेशन अंतर्गत जळगावला घेऊन जाणाऱ्या 50 जणांसाठी प्रशिक्षण घेतले आहे. उत्पादकता आणि तंत्रज्ञान वाढवण्यासाठी आणि शेतजमिनीला मदत करण्यासाठी. सीएसआर अंतर्गत १० कोटी शिल्लक जी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि उत्पादकता वाढवण्यासाठी वापरली जाईल. शिक्षण आणि रोजगार ही दुसरी चिंता आहे. सादरीकरणामध्ये दर्शविलेल्या तक्त्यानुसार २०२१-२०२२ मध्ये आमचा एकूण ६५१ रोजगार दर आहे जो २०२२-२०२३ मध्ये ६८२ पर्यंत वाढेल आणि चालू वर्षापर्यंत सुद्धा वाढून एकूण ९५२ होईल. गेल्या २-३ वर्षाच्या प्रकल्पानुसार पर्यावरण मंजूरीने DRI प्लांट घेतला आहे जो आत्तापर्यंत बांधकामाधीन आहे आम्ही नोंदवल्यानुसार आम्ही ६५० कर्मचाऱ्यांना रोजगार देत आहोत त्यात आधीच ३०० कर्मचाऱ्यांना काम दिले आहे जे एक प्रगतीशील पाऊल आहे. ज्यामध्ये आत्तापर्यंत आमच्याकडे ९५२ रोजगार आहेत, प्रकल्प पूर्ण होईपर्यंत आणि सुरू होईपर्यंत कुशल कर्मचाऱ्यांना रोजगार देण्याचे लक्ष्य आहे. एस्पर टक्केवारी घ्या, सादरीकरणात एक तक्ता दर्शविला आहे. जवळपास ७५% हे १० किमी आणि ते १५ किमी अंतरावर आहे जे चंद्रपूर अंतर्गत आहे सुमारे २१% सुमारे ९५% लोक आपल्या जिल्ह्याच्या अंतर्गत आहेत आणि सुमारे ५% कर्मचारी जिल्ह्याबाहेर आहेत. आम्ही रोजगार कसा देऊ? जोगी आयटीआयमध्ये सुमारे २१ जणांना लॉयड्स मेटल अँड एनर्जी लिमिटेडकडून पूर्णपणे मोफत प्रशिक्षण दिले जाते. पांढरकवडामध्ये आम्ही सुमारे २८ लोकांसाठी कौशल्य केंद्र अंतर्गत प्रशिक्षण सुरू केले आहे. प्रथम |

संस्था ही एक सरकारी योजना आहे जिथे आम्ही प्रतिभावान आणि उज्ज्वल भविष्यासाठी लोकांची नोंदणी केली आहे. ८,९,१० विद्यार्थ्यांसाठी LOLT नावाच्या एनजीओनुसार आम्ही विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना प्रशिक्षण देत आहोत. Graduate Engineer Trainee ३४-३५ Graduate Engineer Trainee ला लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमधून नोंदणीकृत करण्यात आले आहे. सन २०२१-२०२२ मधील सादरीकरणानुसार प्रदूषण नियंत्रण यंत्रणा १०० टनप्रतिदिन आयडी फॅन १,२,३ आणि ४ पूर्णपणे बदलले आहे, कन्व्हेयर बेल्ट कव्हर केला गेला आहे २०२१-२०२२ या वर्षासाठी एकूण ३०५ कोटी खर्च केले आहेत. सन २०२२-२०२३ प्लांटच्या आत आणि बाहेर २ वर्षापूर्वी काँक्रीटचा रस्ता तयार केला जाईल. रस्त्यांची स्थिती चांगली नाही. ट्रक वॉशिंग सिस्टम देखील स्थापित केले आहे, जिथे येणारे आणि जाणारे दोन्ही ट्रक आमच्या प्लांटमध्ये प्रवेश करण्यापूर्वी आणि बाहेर पडण्यापूर्वी धुतले गेले आहेत. सन २०२३-२०२४ प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी ३१५ कोटी खर्च केले आहेत तसेच प्रदूषण नियंत्रणासाठी २-३ वर्षात एकूण १३५० कोटी खर्च करण्यात आले आहेत. सन २०२४-२०२५ आम्ही प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी सुमारे ४० कोटी खर्च करत आहोत ज्यामध्ये धूळ हाताळणी प्रणाली, डिडस्टिंग सिस्टम, बॅक फिल्टर, ईलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसिपिटेटर अपग्रेड केले गेले आहे, नवीन कंप्रेसर स्थापित केले गेले आहे, पॅकेज घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा स्थापित केले जात आहे, १३२ किलावॉट अक्षय ऊर्जा सौर संयंत्र देखील आहे. वर्षभरात ९०० शुन्य द्रव्य निस्सारण प्लांट देखील स्थापित केले जात आहेत. आता आम्ही OCEMS मध्ये परिणाम पाहू शकतो जे साइटवर उपलब्ध असलेल्या मर्यादित डेटामध्ये आहे. प्रस्तावित प्रकल्प जो ५००० कोटींचा आहे जेथे ३०० कोटी भांडवली खर्च आहे शिवाय पर्यावरणीय उपकरणांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानासह ऑपरेशनल देखभाल खर्चासाठी गुंतवणूक. डब्ल्युएचआरबी स्थापित केले गेले आहे लॉयड्स मेटल्स अँण्ड एनर्जी लि. ही २०१० पासून वीज निर्मितीसाठी वेस्ट हीट रिकव्हरी बॉयलर वापरणारी पहिली कंपनी आहे. आम्ही वीज निर्मितीसाठी कोळशाचा वापर करत नाही, आम्ही वीज निर्मितीसाठी डब्ल्युएचआरबी वापरतो. आमच्या नवीन प्लांटमध्ये डब्ल्युएचआरबी मधून १०० मेगावॅट वीज निर्माण होत आहे. आम्ही लोकांसाठी वापरण्यासाठी २ नवीन रुग्णवाहिका प्रस्तावित करत आहोत ज्या पूर्णपणे विनामूल्य आहेत जिथे एक रुग्णवाहिका ही मूलभूत जीवन समर्थन रुग्णवाहिका आहे जी घुगस भागात मोफत उपलब्ध असलेल्या उत्तम रुग्णवाहिकांपैकी एक आहे. पीएचसीचे काम सुरू झाल्यावर आम्ही ४० लाखांची उपकरणे आधीच पीएचसीला दिली. आहेत. या उपकरणाचा वापरही सुरू झाला आहे. आम्ही खात्री देत आहोत की आम्ही जे तंत्रज्ञान वापरणार आहोत ते सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञान असेल जेथे शून्य प्रदूषण असेल आणि त्यासाठी स्थानिक लोकांचा प्रचार आणि मदत लक्षात घेऊन. मिश्रा जी, चिंता मी खात्री देतो की आम्ही रस्ता उपलब्ध करून देत आहोत आणि आम्ही चर्चा करून तीच चिंता पूर्ण करू. महिलांचा रोजगार हा एक चिंतेचा विषय आहे आजपर्यंत आमच्याकडे ४०-४५ महिला कर्मचारी म्हणून आवश्यक कौशल्य आणि पात्रतेनुसार आम्ही रोजगार देत आहोत. गारमेंट युनिट सुचवले आहे जी चांगली सूचना आहे आणि तीच सूचना सकारात्मक दृष्टीकोन ठेवून आम्ही पुढे येत आहोत ज्यामुळे थेट महिलांना रोजगार मिळेल.

वरील मुद्द्यांचा सारांश:-

**CSR उपक्रम आणि समुदाय विकास**

१. कृषी विकास

- **कृषी मेळावा:** उत्पादकता वाढविण्यासाठी १,३०० शेतकऱ्यांना जैन सिंचन तंत्राचे प्रशिक्षण दिले.
- **कौशल्य विकास:** प्रगत कृषी पद्धती आणि तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी जळगावमधील ५० व्यक्तींना प्रशिक्षण दिले.
- **CSR गुंतवणूक:** भविष्यातील शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम आणि उत्पादकता उपक्रमांसाठी १० कोटींची तरतूद.

२. शिक्षण आणि रोजगार

- **रोजगार वाढ:** २०२१-२२ मधील रोजगार ६५१ वरून चालू वर्षात ९५२ पर्यंत वाढला आहे, ज्यामध्ये पुरुष आणि महिला दोन्ही कर्मचारी आहेत.
- **ड्राय प्लांट प्रकल्प:** सध्या सुरू असलेल्या द्री प्लांट प्रकल्पासाठी एकूण ६५० उद्दिष्टांपैकी ३०० लोकांना रोजगार दिला.
- **स्थानिक रोजगार:** ९५% कर्मचारी जिल्ह्यातील आहेत, ७५% चंद्रपूरच्या १०-१५ किमी परिसरात राहतात.

३. कौशल्य विकास कार्यक्रम

- **जोगी आयटीआय:** Lloyds Metals and Energy Ltd च्या सहकार्याने 21 जणांना मोफत प्रशिक्षण दिले.
- **पदरकवडा कौशल्य केंद्र:** २८ व्यक्तींना प्रशिक्षण दिले.
- **प्रथम संस्था:** कौशल्य विकासासाठी सरकार प्रायोजित कार्यक्रमांमध्ये व्यक्तींची नोंदणी केली.
- **LOL:** LOLT NGO च्या माध्यमातून विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रशिक्षण दिले.
- **मिळवा:** GET कार्यक्रमात स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ३४-३५ व्यक्तींची नोंदणी केली.

४. प्रदूषण नियंत्रण

- **महत्त्वपूर्ण गुंतवणूक:** गेल्या तीन वर्षांत प्रदूषण नियंत्रण उपायांमध्ये १,३५० कोटींहून अधिक गुंतवणूक केली आहे.
- **पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा:** कॉंक्रीट रस्ते बांधणी, ट्रक वॉशिंग सिस्टीम आणि अपग्रेडेड प्रदूषण नियंत्रण उपकरणे लागू केली.
- **अक्षय ऊर्जा:** पर्यावरणावरील प्रभाव कमी करण्यासाठी १३२ kW चा सोलर प्लांट आणि ९०० ZLD चा प्लांट बसवला.
- **प्रस्तावित प्रकल्प:** पर्यावरणीय उपकरणांमध्ये ३०० कोटी भांडवली गुंतवणुकीसह ५,००० कोटींचा प्रकल्प आखला.
- **WHRB तंत्रज्ञान:** वीज निर्मितीसाठी वेस्ट हीट रिकव्हरी बॉयलर तंत्रज्ञान स्वीकारले, कोळशावरील अवलंबित्व कमी केले.

| | |
|---|---|
| | • **समुदाय पुढाकार:** स्थानिक समुदायाला दोन मोफत रुग्णवाहिका आणि ४० लाखांची उपकरणे दिली.<br>• **भविष्यातील फोकस:** शून्य प्रदूषणासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यासाठी आणि स्थानिक विकासाला पाठिंबा देण्यासाठी वचनबद्ध आहे.<br><br>**अतिरिक्त टिपा:**<br><br>• **मिश्राजींची चिंता:** रस्ता बांधकामाचा प्रश्न सोडवणार.<br>• **महिला रोजगार:** सध्या ४०-४५ महिलांना रोजगार देते आणि गारमेंट युनिटच्या संधी शोधण्यासाठी खुले आहे. |

### ७२) श्री. भास्कर सोनुले, शेनगांव, ता.जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | लॉयड मेटल्स कंपनीने ज्या शेतकऱ्यांचे नूकसान झाले आहे त्यांना रू. ५०,०००/- इतके नूकसान भरपाई दिली पाहिजे. तसेच स्थानिक गरजू लोकांना रोजगार देण्यात यावा. तसेच सीएसआर निधीचा पूरेपूर वापर करून परिसरातील गावांचा विकास करावा. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

### ७३) श्री. अमित, शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्ही प्रदूषणाबाबत वारंवार तक्रारी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिलेले आहेत. घुग्घूस व आजूबाजुच्या परिसराच्या गावामधील मुलांना मोफत शिक्षण देण्यात यावे. तसेच आरोग्य विषयक समस्या उद्भवल्यास ग्रस्त १०० व्यक्तिंना प्रत्येकी रू. २५.० लाख द्यावे. कंपनीने घुग्घूसवासीयांना सौर ऊर्जा सयंत्र बसवून द्यावे जेणेकरून वीजेची बचत होईल. कंपनीमध्ये कार्यरत कामगाराला ३ वर्षांपूर्वी अर्धांगवायुचा आजार झाला असून त्या कामगाराच्या मुलाला कंपनीमध्ये रोजगार द्यावा ही माझी विनंती आहे. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

७४) <u>श्री. नांदे, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने सन १९९४ ते २००७ पर्यंत ज्या शेतकऱ्यांचे नूकसान झाले त्यांना नूकसान भरपाई दिलेली नाही व त्यांच्याकडे दुर्लक्ष करत आहेत. मागील जनसुनावणीमध्ये याबाबत समिती स्थापन करून यावर तोडगा काढण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. माझी मागणी आहे की कंपनीने याबाबत संबंधित नूकसान ग्रस्त शेतकऱ्यांना योग्य तो माबदला द्यावा. | सूचनेची नोंद घेतलेली आहे. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ७१ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

(उमाशंकर भादुले)
समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

(तानाजी यादव)
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

(श्रीकांत देशपांडे)
अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर